। लातूर । वर्ष ३५ वे । अंक ९६ वा । शुक्रवार, दिनांक ०३ जुलै २०२६ । पृष्टे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## स्टिंग पेय विक्रीला बंदी

**मुंबई/वृत्तसेवा: राज्यात शाळा परिसरामध्ये स्टिंग पेय विक्रीला बंदी घालण्यात आली आहे. शाळांच्या ५०० मीटर परिसरामध्ये आता स्टिंग पेय विक्रीसाठी बंदी असणार आहे. सध्या सुरु असलेल्या पावसाळी अधिवेशनात श्रीगोंदा–नगर विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे आमदार विक्रम पाचपुते यांनी स्टिंग पेयबाबत प्रश्न उपस्थित केला होता. यानंतर मंत्री नरहरी झिरवळ यांनी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांचे निर्देश राज्यात शाळा परिसरामध्ये स्टिंग पेय विक्रीला बंदी घालण्याचे निर्देश दिले.**

स्टिंग एनर्जी ड्रिंकमुळे आरोग्यावर दुष्परिणाम होत आहेत. नियमात बसत असले तरी मुलांना याची सवय लागते. लहान मुले, गरोदर महिलांसाठी पिण्यासाठी योग्य नसल्याचे स्टिंग पेयच्या बाटलीवरचं लिहिले आहे. लहान मुलांना याची विक्री होवू नये. दारूपेक्षाही स्टिंग एनर्जी ड्रिंक हे घातक आहे, अशी माहिती श्रीगोंदा–नगर विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे आमदार विक्रम पाचपुते यांनी विधानसभेत दिली. यावर स्टिंग हे शाळेच्या आवारात हे विकले जातंय हे मान्य आहे. शाळांच्या ५०० मीटरच्या आत अंमली पदार्थांसह स्टिंग एनर्जी ड्रिंकवरही बंदी घालू, असं आश्वासन अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी दिली.

**तुकाराम मुंढेची विधानभवनात एन्ट्री**

शुक्रवारी विधानसभेत स्टिंग एनर्जी ड्रिंकबाबत चर्चा होती. त्यामुळे तुकाराम मुंढे विधानभवनात दाखल झाले होते. दरम्यान, राज्यभरात प्रतिबंधित गुटखा आणि पानमसालाविरोधात अन्न व औषध प्रशासनाने धडक मोहीम राबवत आहे. अन्न व औषध प्रशासनानेचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानूसार महाराष्ट्रभर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रेस्टॉरंटवर देखील कारवाई केली जात आहे.

**तुकाराम मुंढे यांच्या अंतर्गत तपासणी सुरू – नरहरी झिरवळ**

अनेक पेय उर्जा देण्याच्या नावाखाली शाळा परिसरात ड्रिंक्स विक्री, शाळा परिसरात फ्लेवर पानाखाली अंमली पदार्थ विक्री होते, चौकशी करावी, अशी मागणी भाजपचे आमदार राहुल कुल यांनी केली. तसेच दुध भेसळ फ्लेवर मिल्क नावाखाली विक्री होते, जास्त साखर, कृत्रिम द्रव्य वापर होतो, याचीही चौकशी केली जावी, असं राहुल कुल म्हणाले. यावर तुकाराम मुंढे यांच्या अंतर्गत तपासणी सुरू आहे, अशी माहिती नरहरी झिरवळांनी विधानसभा सभागृहात दिली.




**मुंबईतील ६ नामांकित हॉटेल्स, रेस्टॉरंटवर तुकाराम मुंढेंची कारवाई**

राज्यभरात प्रतिबंधित गुटखा आणि पानमसालाविरोधात अन्न व औषध प्रशासनाने धडक मोहीम राबवत आहे. आता अन्न व औषध प्रशासनाने मुंबईतील ६ नामांकित हॉटेल्स, रेस्टॉरंटसह बेकरींवर कारवाई करण्यात आली आहे. मुंबईत अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या हॉटेल्सवर एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशानुसार धडक कारवाई करण्यात आली. मुंबईतील आदित्य बिर्ला समूहाशी संबंधित एका नामांकित रेस्टॉरंटसह सहा रेस्टॉरंट, हॉटेल, बेकरी आणि क्लबच्या अन्न सुरक्षा परवान्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. नरिमन पॉइंट येथे 'फ्लिंट अँड वार्सा' या रेस्टॉरंटची २७ जून रोजी तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान अन्नपदार्थांच्या चुकीच्या ब्रँडिंगचे प्रकार आढळून आले. अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन झाल्याने संबंधित आस्थापनेच्या परवान्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. तर बोरीवली इथल्या एम. के. बेकरीमध्ये नूतनीकरणाचे काम सुरू असतानाच अन्न उत्पादन सुरू असल्याचे आणि मोठ्या प्रमाणात अस्वच्छता आढळल्याने कारवाई करण्यात आली. याशिवाय, भांडुप, सांताक्रूझ आणि वांद्र्यातही कारवाई करण्यात आली.

## तृतीयपंथीय विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासनाची विशेष
## शिष्यवृत्ती आणि स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल योजना

**लातूर/प्रतिनिधी: भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या वतीने तृतीयपंथीय व्यक्तींच्या कल्याणासाठी 'SMILE' (Support for Marginalized Individuals for Livelihood and Enterprise) या केंद्रीय क्षेत्र योजनेअंतर्गत विशेष उपयोजना सुरू करण्यात आली आहे. ही योजना केंद्र शासनाच्या https://transgender.dosje.gov.in/ या राष्ट्रीय पोर्टलवरून राबविण्यात येत आहे.**

या योजनेअंतर्गत शासनमान्य किंवा खासगी शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये इयत्ता नववी ते पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेणाऱ्या व भारताचे नागरिक असलेल्या तृतीयपंथीय विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष १३ हजार ५०० रुपये इतकी मॅट्रिकपूर्व (प्रि–मॅट्रिक) व मॅट्रिकोत्तर (पोस्ट–मॅट्रिक) शिष्यवृत्ती अनुज्ञेय राहील. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्याकडे सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या राष्ट्रीय पोर्टलवरून जारी केलेले तृतीयपंथीय ओळखपत्र असणे आणि त्यांचे बँक खाते आधार संलग्न असणे आवश्यक आहे. ही शिष्यवृत्ती मर्यादित स्वरूपात असल्याने लाभार्थ्यांची निवड मागील शैक्षणिक वर्षातील गुणांच्या आधारे केली जाईल, तसेच केंद्र किंवा राज्य शासनाच्या इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देय राहणार नाही; त्यामुळे पात्र उमेदवारांनी राष्ट्रीय पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर करावा. या शैक्षणिक सुविधेशोबतच, राज्यातील तृतीयपंथीयांना स्वयंरोजगार व व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास घडवून आणण्यासाठी 'बीज भांडवल योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यात किमान १० वर्षे वास्तव्य असलेल्या १८ ते ५० वयोगटातील व्यवसाय करण्यास सक्षम अशा अप्रशिक्षित किंवा प्रशिक्षित तृतीयपंथीय व्यक्तींना व्यवसायाचे प्रशिक्षण देऊन आवश्यक साधन संच (टूल किट) व कर्जाची सुविधा दिली जाणार आहे. योजनेअंतर्गत उमेदवारांना २५ हजार रुपयांपर्यंत लघु कर्ज, ५० हजार रुपयांपर्यंत मध्यम कर्ज आणि २ लाख रुपयांपर्यंत दीर्घ कर्ज यांपैकी कोणतेही एक कर्ज अनुज्ञेय राहील, ज्यामध्ये लाभार्थ्याचा हिस्सा ५ टक्के, शासन अनुदान ४५ टक्के आणि उर्वरित ५० टक्के रक्कम राष्ट्रीयकृत बँकेमार्फत कर्ज स्वरूपात उपलब्ध करून दिली जाईल. तसेच या योजनेअंतर्गत नियमित कर्ज फेडणाऱ्या लाभार्थ्यांना व्याजावर ३ टक्के सूट (रिबेट) दिली जाणार आहे. इच्छुक उमेदवारांनी व्यवसायासाठीचा परवाना, यंत्रसामुग्रीचे कोटेशन किंवा बिले, जागेचा ७/१२ उतारा अथवा भाडेकरारनामा आणि स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र यांसह शासनाने विहित केलेल्या नमुन्यातील अर्ज संबंधित जिल्ह्याच्या समाज कल्याण सहाय्यक आयुक्तांकडे सादर करणे आवश्यक आहे.

या योजनांच्या अधिक माहितीसाठी पात्र लाभार्थ्यांनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, लातूर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूर येथील समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्तांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

## लातूर जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध पोलिसांची धडक मोहीम

### ➤ एका महिन्यात ७२१ गुन्हे दाखल ➤ ७७८ आरोपींवर कारवाई, १ कोटी २० लाख ५३ हजार ७१२ रुपयांचा मुद्देमाल जप्त

**लातूर/प्रतिनिधी:** समाजातील शांतता, सुरक्षितता व कायदा–सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने लातूर जिल्हा पोलीस दलाकडून सातत्याने प्रभावी व कठोर कारवाई करण्यात येत आहे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी तसेच स्थानिक गुन्हे शाखेला अवैध धंद्यांविरोधात ठोस व परिणामकारक कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश दिले होते.

त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ०१ जून २०२६ ते ३० जून २०२६ या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात विशेष मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान शहरी तसेच ग्रामीण भागात एकाचवेळी नियोजनबद्ध पद्धतीने छापेमारी करून अवैध देशी–विदेशी दारू विक्री, जुगार, अमली पदार्थांची तस्करी, गुटखा विक्री तसेच बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात आली.

या कालावधीत एकूण ७२१ गुन्हे दाखल करून ७७८ आरोपींविरुद्ध कारवाई करण्यात आली असून १ कोटी २० लाख ५३ हजार ७१२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामध्ये दारूबंदी प्रकरणे- ६२२ गुन्हे, ६३० आरोपी, २६,४२,६०५ किंमतीचा मुद्देमाल जप्त.जुगार प्रकरणे- ७३ गुन्हे, १०६ आरोपी, ४०,३१,२८० किंमतीचा मुद्देमाल जप्त. गांजा प्रकरणे-३ गुन्हे, ३ आरोपी, ३,३०,५०० किंमतीचा मुद्देमाल जप्त.गुटखा प्रकरणे -१२ गुन्हे, २४ आरोपी, ४१,८१,०२७ किंमतीचा मुद्देमाल जप्त.आर्म क्ट प्रकरणे-११ गुन्हे, १५ आरोपी, ८,६८,३०० किंमतीचा मुद्देमाल असा एकूण १ कोटी २० लाख ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे

अवैध धंद्यांमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींवर केवळ गुन्हे दाखल करून न थांबता, त्यांच्याकडून पुन्हा अशा प्रकारचे गैरकृत्य घडू नये यासाठी संबंधितांविरुद्ध प्रतिबंधक कारवाईदेखील करण्यात आली आहे. प्रतिबंधक आदेशांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

यावेळी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सांगितले की, लातूर जिल्ह्यात अवैध धंद्यांना कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि कायदा–सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अशा धडक कारवाया यापुढेही अधिक तीव्रतेने व सातत्याने सुरू राहतील. नागरिकांनी अवैध धंद्यांची माहिती पोलीस प्रशासनास देऊन सहकार्य करावे.

### प्रभात किरणे

ना अहंकार ना गर्व,विश्व निर्मित्यास
ना भेटेला कधी,ना ठाव ठिकाणा
सातचे कोटी चेहरे,स्वर वेगवेगळे
न सारखे,बोटंचे ठसे,नयन बुबाळे

–इंजि. नागनाथ कलवले

लातूर ९७६४७ ८८२८८

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**लोकप्रतिनिधींना गुन्ह्यात सलग तीस दिवस कोठडी मिळाल्यास पद रद्द होणार.**



### चिमटा

दयाचा

पान–टपरी शाळेजवळ उघडली जाते!
येथे ग्राहक संख्या अधिक असते!!
सर्वच मिळते म्हणून गर्दी अधिक असते!!!

**पीएम यशस्वी योजना**

## लातूर जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी
## ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/(जिमाका)** 'पीएम यशस्वी' अंतर्गत 'टॉप क्लास एज्युकेशन इन स्कूल फॉर ओबीसी, ईबीसी अँड डीएनटी स्टुडंट्स' या योजनेची शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ मध्ये लातूर जिल्ह्यात अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे.

या योजनेतंर्गत शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर आपले अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत देण्यात आली आहे.

या योजनेसाठी लातूर जिल्ह्यातील नामांकित (टॉप क्लास) शाळा किंवा कॉलेजमध्ये इयत्ता ९ वी ते इयत्ता १२ वी मध्ये शिकणारे आणि इतर मागासवर्गीय, आर्थिकदृष्ट्या मागासलेले तसेच विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे एकूण वार्षिक उत्पन्न २ लाख ५० हजार रुपयांपेक्षा कमी आहे, असे सर्व विद्यार्थी पात्र ठरणार आहेत.

या कल्याणकारी योजनेच्या अंमलबजावणीबाबत जिल्ह्यातील सर्व संबंधित शाळा आणि महाविद्यालयांनी तात्काळ पुढाकार घेऊन आपल्या संस्थेतील १०० टक्के पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहित मुदतीत नॅशनल पोर्टलवर भरून घ्यावेत, एकही पात्र विद्यार्थी या शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये, यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन लातूर येथील इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक अभय प्र. अटकळ यांनी केले आहे.

## अवघ्या १० तासांत अल्पवयीन मुलीचा शोध
## उदगीर ग्रामीण पोलिसांची तत्पर कामगिरी

**लातूर/प्रतिनिधी:** पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या निर्देशानुसार तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, उदगीर गजानन भातलवंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दिलीप गाडे यांच्या नेतृत्वाखाली उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकाने उल्लेखनीय कामगिरी करत पळवून नेण्यात आलेल्या १२ वर्षीय अल्पवयीन मुलीचा अवघ्या १० तासांत शोध घेऊन तिला सुखरूप तिच्या पालकांच्या ताब्यात दिले. आहे.

फिर्यादी महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, तिची १२ वर्षीय अल्पवयीन मुलगी ३० जून २०२६ रोजी रात्री घरातून बेपत्ता झाली होती. कोणीतरी अज्ञात व्यक्तीने तिला फूस लावून पळवून नेल्याची तक्रार प्राप्त होताच उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४५०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १३७(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा दाखल होताच पोलीस निरीक्षक दिलीप गाडे यांच्या नेतृत्वाखाली पथकाने तातडीने तपास सुरू केला. तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज, गोपनीय माहिती वरून विविध ठिकाणी शोधमोहीम राबविण्यात आली.

अखेर अथक प्रयत्नांमुळे अवघ्या दहा तासांत अल्पवयीन मुलीचा शोध घेण्यात आला व तिला सुरक्षितपणे तिच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले.

## एर्टिगा कारसह ११.७८ लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्ह्यात प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखूच्या अवैध वाहतुकीविरुद्ध सुरू असलेल्या मोहिमेत शिरूर अनंतपाळ पोलिसांनी कारवाई करत एक एर्टिगा कारसह तब्बल ११ लाख ७८ हजार १०० रुपयांचा प्रतिबंधित गुटखासह जप्त केली आहे. या प्रकरणी दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसासकडून समजलेली माहिती अशी की, पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी जिल्ह्यात चालणाऱ्या अवैध धंद्याचा समूळ उच्चाटन करण्यासंदर्भात वेळोवेळी सर्व ठाणेदारांना वेळोवेळी सूचना देऊन निर्देशित केले होते त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात दिनांक १ जुलै २०२६ रोजी संध्याकाळी शिरूर अनंतपाळ पोलिसांना मिळालेल्या



गोपनीय माहितीवरून कर्नाटक राज्यातून अहमदपूरच्या दिशेने सिल्व्हर रंगाच्या एमएच–२४ एएस–४६२८ क्रमांकाच्या एर्टिगा कारमधून प्रतिबंधित गुटखा आणला जात असताना पोलीस निरीक्षक बालाजी भंडे यांचे मार्गदर्शनात पोलिसांनी सापळा रचून दि. २ जुलै २०२६ रोजी मध्यरात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास मौजे तळेगाव (दे.) येथे पोलिसांनी वाहन अडविण्याचा प्रयत्न केला असता चालकाने वाहन जागेवरच सोडून अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पळ काढला.

त्यानंतर पोलिसांनी वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये शासनाने प्रतिबंधित केलेला मोठ्या प्रमाणात गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ आढळून आले. यामध्ये २,८३,९२० रुपयांचा विमल पान मसाला, १,२१,६८० रुपयांचा व्ही–१ गुटखा, २२,५०० रुपयांची यू.के. जाफरानी जर्दा तसेच ७,५०,००० रुपये किमतीची एर्टिगा कार असा एकूण ११,७८,१०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तपासादरम्यान वाहनातील कागदपत्रांच्या आधारे सय्यद मोजम आजम व इब्राहिम तांबोळी, दोघेही रा. अहमदपूर, जि. लातूर, यांच्याविरुद्ध गु.र.नं. १४३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ चे कलम ५९ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रायबोळे करीत असून फरार आरोपींचा शोध सुरू आहे. जिल्ह्यात प्रतिबंधित गुटखा, तंबाखूजन्य पदार्थ व इतर अवैध धंद्यांविरुद्ध लातूर जिल्हा पोलीस दलाची कारवाई यापुढेही अधिक प्रभावीपणे सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

सदरची कारवाई वरिष्ठाचे मार्गदर्शनात शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार गौतम घाडगे, संदीप साठे, विकास लोखंडे यांनी केली आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## निसर्गच खरा भविष्यकार...

देशात भविष्य सांगणारे लबाड ठरले आहेत. भविष्य खरे का खोटे यात जाण्याची गरज नाही. मात्र आता ते लबाड ठरल्याचे दिसून येत आहे. यावर्षी पावुस कमी होणार, दुष्काळ पडणार, निनो-वादळाचा तडाखा बसणार, जुलै महिण्यात कमी पाऊस आदि नको ते भयभित करणारे भाकित वर्तविले गेले. ते चुकीचे ठरत असून राज्यात बऱ्यापैकी मुसळधार पाऊस पडत आहे. ढगफुटी होताना दिसून येत आहे. पेरणी लांबली असली तरी पाऊस बऱ्यापैकी पडत आहे असे चित्र दिसून येत आहे. आपल्या राज्यातील किंबहून देशातील भविष्यकारांनी नको त भयाण भाष्य केले होते, त्यामुळे शेतकऱ्यासह सर्वच घाबरले होते. निसर्गाची किमया मोठी असते. निसर्गाचा जनतेनी कितीही ऱ्हास केला तरी तो कोपत नाही. दयाच दाखवितो हे लक्षात येते. मानव अनेक चुका करीत आहे. झाडे तोडत आहे. प्रदुषन वाढवित आहे. मोठ्या प्रमाणात दुषीत वायू सोडत आहे. नदी-नाळे दुषीत करीत आहेत. गटार प्लास्टीकच्या बाटल्याने भरल्या जात आहेत. पातळ कॅरिबॅगचा सर्रास वापर होताना दिसून येत आहे. सर्व निसर्गाच्या विपरीत चालू असताना निसर्ग शेतकऱ्यासाठी मदत करीत आहे. मदतीसाठी धावुन आला आहे. पाऊस नाही-नाही म्हणत पडत आहे. भविष्य सांगणारे व जे आता लबाड हवामानाचा अंदाज सांगणाऱ्याची चेहरे पडली असणार. एक लक्षात घ्यावे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी एका रात्रीत नोटाबंदी जाहिर केली. पाचशेच्या नोटा चलनातून रद्द केल्या त्यावेळी भविष्यसांगणाऱ्यांना कसे कळले नाही. त्यांना तर अगोदर माहिती पडायास पाहिजे. सोन्याच्या किंमती गगणाला भिडणार हेही छातीठोक सांगितले नाही. ऑपरेशन सिंदुर होणार हेही सांगितले नाही. असे अनेक प्रसंग सांगता येतील ते भविष्य सांगतले जात नाही. भविष्य सांगणारे लबाड असतात. शिकलेली मंडळी सुद्धा बळी पडते. भोंदुगिरीमुळे घर बरबाद होते. अशी उदा. घडली आहेत. जी मंडळी विज्ञानाला धरून बोलते ते सत्य आहे. विज्ञान चुकीचे ठरू शकत नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. भारतीय पुरातन विज्ञान सत्य आहे. त्यामुळे भारतीय वंशाच्या ऋषीमुनींनी जे सिद्धांत मांडले ते सत्य आहेत. आलिकडील सर्व लबाड आहे. त्यामुळे आता देशातील नागरिकांनी सावध झाले पाहिजे. लबाड भविष्य सांगणारे उघडे पडल्याने आता तरी विज्ञानावर भरोसा ठेवा. आलिकडे भविष्य वर्तविणाऱ्याची संख्या वाढली आहे. निसर्ग आपला नियम मोडत नाही. निसर्ग साथ देतो. मातृभुमीवर वाईट घडू देत नाही. पाऊस नाही. निनोहवामानामुळे दुष्काळ असे भयभित करणारे भाकित सांगणारे चुकीचे ठरल्याचे जनतेनी लक्षात घेतले पाहिजे. ज्यांना नोटाबंदीची कल्पना आली नाही. ते स्वत:चे भविष्य ओळखू शकत नाही ते इतरांचे काय सांगणार? हे जनतेनी लक्षात ठेवावे. पाऊस का कमी पडतो. ऋतूमान का बदलत आहे. याचे सरळ सोप उत्तर म्हणजे, माणुस निसर्गाचा ऱ्हास करीत आहे. निसर्गाच्या विपरीत चालत आहे. झाडे तोड अमाप करीत आहे. सरकारचे लक्ष याकडे नाही. वृक्षतोड केल्यास शिक्षा कठोर होत नाही. पाण्याचा बेसुमार उपसा होत आहे. जमीन विंधन विहीरीने चाळणीसारखी केली आहे. हे सरकारच्या लक्षात येत नाही. लबाड हवमानाचा अंदाज सांगणाऱ्यास रोखले जात नाही. अशा लबाडामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात एका ठिकाणी पाऊस पडणार असे भाकित केले मात्र पावुस तर पडला नाही उलट शेतकऱ्याचे द्राक्षे घेवुन जाणारे व्यापारी फिरकले नाही. नुकसान द्राक्षा बागायतगाराचे झाले. याला जबाबदार कोण? पाऊस येणार असे चुकीचे भाकित केल्यावर द्राक्षा, फळे घेवुन जाणारे व्यापारी फिरकत नाहीत. मोठे नुकसान हे शेतकऱ्याचे होते. अगोदरच मोठ्या संकटात सापडणारा व्यक्ती शेतकरी आहे तोच अधिक जीवन संपवित आहे असे असताना चुकीचे भाकित सांगणाऱ्यानी विचार केला पाहीजे. सुरवातीच्या काळात राज्यात दुष्काळजन्य परिस्थितीचा अंदाज वर्तविला होता. आता पाऊस बऱ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे या बाबीवरून एक लक्षात घेतले पाहिजे. जे भविष्य सांगणारे अंदाज चुकीच्या पद्धतीने वर्तविणारे यांच्यावर भरोसा ठेवू नका. सरकारकडून जी अधिकृत माहिती हवमान विभागाकडून मिळते त्यावर विश्वास ठेवा. चुकीच्या व्यक्तीवर विश्वास ठेवून आपलेच नुकसान करून घेवू नका. जग कुठल्याकुठे गेले, चंद्रावर गेले. अनेक यान सोडले जात आहेत. नवनवीन अद्भुत माहितीचा शोध घेत आहे. असे असताना लबाड भविष्य सांगणाऱ्यावर विश्वास का ठेवता? ईश्वराने मानवावर मोठी कृपा केली आहे. सर्व सजीव प्राण्यात मानवाला अधिक बुद्धी दिली आहे. तीच वापर केला पाहिजे. त्याच प्रमाणे आपल्याचुकीमुळे हवामानात बदल होत आहे. पुर्वी सारखी झाडे नाहीत. वातावरणात मोठ्या प्रमाणात उष्णता वाढत आहे. हे सहज लक्षात येते. तरी भविष्य सांगणाऱ्यकडे जातोत हे चुकीचे आहे. आपले भविष्य आपल्या हाती आहे. हे लक्षात घेतले पाहिजे. पाऊस पडणार नाही, पडला तर कमी प्रमाणात, दुष्काळजन्य स्थिती निर्माण होणार असे भाकित लबाड ठरल्यात जमा आहे. त्यामुळे बंधुनो विज्ञानावर विश्वास ठेवा. आपल्यापुर्वजांनी जे मार्गदर्शन केले आहे त्यावर चिंतन करा. पुर्वी शेती जैविक करीत रासायनिक नाही. ही बाब लक्षात ठेवा. सध्याला चुकचे सांगणारे अनेक निर्माण होत आहेत. ते आपला स्वार्थ साधत आहेत. आपणमात्र कर्जबाजारी होत आहोत. शेतीही मुळात भरोशाची नाही, त्यात लबाडमाणसाचे भाकित देशोधडीला लावत आहे. वास्तविक काही भागात उत्तम पाऊस पडत आहे. हलक्या प्रतीच्या राणात पेरण्या करण्यात हरकत नाही. अशी स्थिती आहे. त्यामुळे निसर्ग, परमपिता परमेश्वर कोणावरही संकट येवू देत नाही. संकटे मानव आपल्या अंगी लादत आहे. जो पर्यंत शेतीत चांगले पिकते त्यावेळी समाधानाची स्थिती निर्माण होते. त्यामुळे एक लक्षात ठेवा भाकित सांगणाऱ्यावर, भविष्य वर्तविणाऱ्यावर, अंदाज तेही लबाड सांगणाऱ्यावर विश्वास ठेवू नका. आपल्याला ईश्वराने बुद्धी दिली तीचा वापर करा. अयोग्यबाबीच्या मागे लागू नका. निसर्ग हाच भविष्यकार आहे, त्यालाची जोपासा, ऱ्हास करू नका...

# निवृत्तीवेतनधारक तसेच कुटुंब निवृत्तीवेतनधारकांसाठी 'महा-उपलब्धी' मोबाईल ॲपचा पहिला टप्पा १ जुलैपासून सुरू

राज्य शासनाच्या सेवेतून निवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारक तसेच कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतनाशी संबंधित विविध माहिती व सेवा प्राप्त करण्यासाठी अनेकवेळा कोषागार कार्यालयाशी संपर्क साधावा लागतो. विशेषतः मासिक निवृत्तीवेतनाबाबतचा तपशील, महागाई भत्ता फरक प्रदान रक्कम, आयकर कपात दाखला फॉर्म नं. १६, उत्पन्नाचा दाखला आणि निवृत्तीवेतन विषयक शासन निर्णय इत्यादी बाबींसाठी त्यांना प्रत्यक्षपणे कोषागार कार्यालयात जावे लागते. राज्यातील बहुसंख्य निवृत्तीवेतनधारक हे ज्येष्ठ नागरिक असल्यामुळे वयोमानानुसार त्यांना उक्त बाबींसाठी कोषागार कार्यालयात जाणे शक्य होत नाही.

या सर्व सेवा जलद व पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने एक स्वतंत्र मोबाईल प विकसित करून निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य शासनाच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा अंतर्गत वित्त विभागाच्या अधिनस्त असलेल्या संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांनी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ (महा-आयटी) मार्फत राज्यातील कोषागार कार्यालयांमधून निवृत्तीवेतन व कुटुंब निवृत्तीवेतन घेणाऱ्या लाभार्थ्यांसाठी 'महा-उपलब्धी' (Maha-UPL-BDHI) एकात्मिक मोबाईल प विकसित केले आहे. त्याचा प्रथम टप्पा १ जुलै २०२६ पासून कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

'महा-उपलब्धी' पचा वापर लातूर कोषागार कार्यालय निवृत्तीवेतन व कुटुंब वेतन घेत असलेल्या सर्व निवृत्तीवेतनधारकांनी करावा आणि या डिजिटल सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन लातूर येथील जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्वला पाटील यांनी केले आहे.

## दुष्टचक्रातून कायमची सुटका... अन् पतपात्र शेतकरी ! — विशेष लेख -२

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची अंमलबजावणी सहकार विभाग, बँका यांच्या समन्वयातून अंतिम टप्प्यात आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणाच्या दुष्टचक्रातून कायमची सुटका करण्यासाठी, त्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी विविध प्रकारे फायदेशीर अशा तरतुदी शासनाने या योजनेत केल्या आहेत. यापूर्वीच्या लेखात आपण दीर्घकालीन संरचनात्मक सुधारणा, योजनेला दिलेले विचारपूर्वक असे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव, शासनाचा या योजनेमागील दूरदृष्टीकोन पाहिला. आज या योजनेतील अभ्यासपूर्ण अशा तरतुदी पाहुयात.

शाश्वत ग्रामीण अर्थव्यवस्था, शेतकरी कल्याणाचा ३०० वर्षांपूर्वीचा आदर्श या योजनेच्या माध्यमातून प्रत्यक्षात साकारण्यात येत आहे. संपूर्ण कर्जमुक्ती, एकवेळ समझोता आणि नियमित परतफेड करणाऱ्यास प्रोत्साहनपर लाभ ही योजनेची तीन मुख्य स्तंभ आहेत. तब्बल ३६ हजार ५८५ कोटींची राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जाच्या दुष्टचक्रातून कायमचे बाहेर काढणारी ही योजना आहे. यातून थकबाकीदार शेतकऱ्यांची कर्जमुक्ती होईल. ज्या शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान अल्पमुदत पीक कर्ज घेतले. ज्यांची ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतची थकबाकी ३१ मार्च २०२६ पर्यंत थकीत राहिली. अशा शेतकऱ्यांना रुपये




२ लाखांपर्यंत कर्जमुक्तीचा थेट लाभ मिळणार आहे. यामध्ये पीक कर्जाचे पुनर्गठित, फेरपुनर्गठित मध्यम मुदत कर्जात रूपांतर झालेल्या खात्यांचाही समावेश असेल.

ज्या शेतकऱ्यांनी २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत घेतलेल्या पीक कर्जाची मुदतीत नियमित परतफेड केली, अशा शेतकऱ्यांना रुपये ५० हजार पर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ मिळेल. जे शेतकरी प्रामाणिकपणे आणि वेळेवर आपल्या कर्जाची परतफेड करतात, त्यांच्यावर अन्याय होऊ नये याचीही काळजी सरकारने घेतली आहे. अशा नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचा प्रोत्साहनपर लाभ दिला जाणार आहे. पण २०२५-२६ व २०२६-२७ मध्ये अल्प मुदत कर्ज घेतले असल्यास अशा कर्जाची देखील विहित मुदतीत परतफेड करावी लागणार आहे.

सन २०२३-२४ किंवा २०२४-२५ मध्ये अल्प मुदत कर्ज घेतले, फेडलेही. प्रत्यक्ष परतफेडीची रक्कम ५० हजारांपेक्षा कमी असल्यास किमान रुपये ५ हजार किंवा प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम प्रोत्साहनपर लाभ म्हणून दिली जाईल, अशाप्रकारे नियमित कर्ज परतफेड करणाऱ्यांना प्रोत्साहन देण्याचे कामही शासन करत आहे. त्यामुळे वित्तीय शिस्तीला प्रोत्साहन मिळेलच.

ज्या शेतकऱ्यांची एकूण थकबाकी २ लाखांपेक्षा जास्त आहे, त्यांनी २ लाखांवरील अतिरिक्त रक्कम बँकेत जमा केल्यास त्यांना उर्वरित रुपये २ लाखांपर्यंतच्या रकमेचा 'एकवेळ समझोता' (जढड) अंतर्गत लाभ मिळणार आहे. बऱ्याचदा कर्ज दोन लाखांपेक्षा थोडे जास्त असते आणि शेतकरी योजनेतून बाहेर पडतो. पण यावेळच्या योजनेत तसे नाही. जर तुमचे कर्ज दोन लाखांहून अधिक असेल, तर वरची अतिरिक्त रक्कम तुम्ही बँकेत भरून या योजनेत सहज सहभागी होऊ शकता. ही रक्कम बँकेत जमा करण्यासाठी शेतकऱ्यांना ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आलेली आहे, ही जढड शेतकऱ्यांना नक्कीच फायद्याची आहे.

ज्या शेतकऱ्यांनी यापूर्वी 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९' चा लाभ घेतला आहे, त्यांना या नवीन योजनेअंतर्गत रुपये ५० हजार मर्यादेपर्यंत कर्जमुक्ती किंवा जढड चा लाभ दिला जाणार आहे, हा पूर्वीच्या लाभार्थ्यांना अतिरिक्त असा दिलासाच आहे.

या तरतुदी अन् अंमलबजावणीतून लाखो शेतकरी बँकिंग व्यवस्थेत पुन्हा पतपात्र बनतील. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होईल, ते यातून उभारी घेतील. ही केवळ कर्जमाफी नाही, तर क्षमता बांधणी आहे. तसेच शेती अर्थव्यवस्थेची संरचनात्मक सुधारणा देखील. (क्रमश:)

- डॉ. श्याम टरके,
सहायक संचालक (माहिती),
विभागीय माहिती कार्यालय, लातूर

# 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' पात्र थकीत कर्जखात्यांवर व्याज न आकारण्याचे जिल्हा बँकांना आदेश

राज्य शासनाच्या सहकार विभागाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना- २०२६' अंतर्गत एक महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या योजनेतील कर्जमुक्ती आणि एकवेळ समझोता योजनेस पात्र असणाऱ्या शेतकऱ्यांच्या थकीत पीक कर्ज खात्यांवर ०१ एप्रिल २०२६ ते योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंतच्या कालावधीसाठी व्याज आकारणी करू नये, असे आदेश शासनाने राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांना दिले आहेत.




राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' योजना जाहीर केली आहे. या अंतर्गत ३० जून २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली पात्र पीककर्जे या योजनेसाठी ग्राह्य धरण्यात आली आहेत. अशा पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार असून, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर एकवेळ समजोता योजनेचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित पीककर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभही देण्यात येणार आहे.

या योजनेत अल्पमुदतीची पीककर्जे तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित पीककर्जांचाही समावेश करण्यात आला आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी मानक कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असून, पात्र कर्जखात्यांची माहिती संगणकीय प्रणालीवर अपलोड करणे, कर्जखात्यांचे पडताळणीकरण, आधार प्रमाणीकरण आणि त्यानंतर कर्जमाफीची रक्कम संबंधित कर्जखात्यात हस्तांतरित करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. कर्जमाफीची रक्कम प्रत्यक्ष खात्यात जमा होण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या कर्जावर व्याज आकारल्यास त्यांच्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडू शकतो. ही बाब लक्षात घेऊन पात्र शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी कर्जमुक्तीचा प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंत थकीत पीककर्जाच्या रकमेवर व्याज आकारणी न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या आदेशामुळे पात्र शेतकऱ्यांच्या थकबाकीत अनावश्यक वाढ होणार नसून, कर्जमुक्तीनंतर त्यांना नव्याने पीककर्ज उपलब्ध होण्याचाही मार्ग अधिक सुलभ होणार आहे. कर्जमुक्ती योजनेची पारदर्शक आणि परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी या आदेशाची तातडीने अंमलबजावणी करावी, असे शासनाने स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७९अ अंतर्गत लोकहिताच्या दृष्टीने हा आदेश जारी करण्यात आला असून, योजनेतील कर्जमुक्ती व एकवेळ समजोता योजनेस पात्र असलेल्या शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंत पात्र थकीत कर्जावर व्याज आकारणी न करण्याचे निर्देश सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत.

# शेती सुधारणा आणि शेतघरासाठी गौण खनिजांच्या वापरावर आता रॉयल्टी आणि दंडाची कारवाई नाही!

**लातूर/प्रतिनिधी** : ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी आणि जमिनीची सुपीकता नैसर्गिकरीत्या टिकवून ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने शेती सुधारणा, शेतरस्त्यांची दुरुस्ती, विहीर किंवा शेतघर आणि जनावरांचा गोठा बांधण्यासाठी लागणाऱ्या गाळ, माती आणि मुरुमासारख्या गौण खनिजांच्या वापरावर आकारले जाणारे स्वामित्वधन (रॉयल्टी) पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय, या कामांसाठी गौण खनिजांची वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर किंवा बैलगाड्यांवर यापुढे कोणतीही दंडात्मक कारवाई केली जाणार नाही. याबाबतचा शासन निर्णय महसूल व वन विभागाने आज निर्गमित केला आहे. मात्र, माती किंवा मुरुमाचा वापर जर व्यावसायिक किंवा वाणिज्यिक उद्देशासाठी केला जात असेल, तर त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई सुरूच राहील.

गेल्या काही वर्षांत सततचा दुष्काळ, हवामान बदल आणि रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे शेतजमिनीची सुपीकता खालावत चालली आहे. दुसरीकडे, जलसंपदा व जलसंधारण विभागाच्या अखत्यारीतील गावतळी, शेततळी, पाझर तलाव आणि महसुली नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्यामुळे त्यांची पाणी साठवण क्षमता कमी झाली आहे. या जलकुंभांमधील गाळ अत्यंत पोषक आणि सुपीक असतो. हा गाळ शेतकऱ्यांना मोफत मिळाल्यास जमिनीची सुपीकता वाढेल, रासायनिक खतांचा खर्च कमी होईल आणि जलकुंभांची साठवण क्षमता वाढून भूजल पातळीत सुधारणा होईल, या उद्देशाने महसूल व वन विभागाने हा निर्णय घेतला आहे.

**स्वामित्वधनातून (रॉयल्टी) सूट**

शेती सुधारणा, शेतरस्ते दुरुस्ती, पावसाळ्यात झालेले खड्डे/चिखल बुजवणे, विहीर, शेतघर आणि जनावरांचा गोठा या कामांसाठी वापरण्यात येणाऱ्या गाळ, माती आणि मुरुमासाठी आता कोणतेही स्वामित्वधन द्यावे लागणार नाही. हा वापर व्यावसायिक स्वरूपाचा नसल्यामुळे, रीतसर परवानगी घेऊन ट्रॅक्टर किंवा बैलगाडीद्वारे वाहतूक करणाऱ्या शेतकऱ्यांवर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६९ मधील तरतुदींनुसार कोणतीही दंडात्मक कारवाई केली जाणार नाही. पोलीस आणि तहसीलदार प्रशासनाला अशा वाहनांवर कारवाई न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**सक्षम अधिकाऱ्यांची ना-हरकत, तलाठी यांची परवानगी आवश्यक**

या गौण खनिजांची वाहतूक करण्यासाठी संबंधित क्षेत्राच्या तलाठ्यांची (ग्राम महसूल अधिकारी) लेखी परवानगी घेणे बंधनकारक असेल. अर्ज प्राप्त झाल्यानंतर तलाठ्यांना १५ दिवसांच्या आत छाननी करून ही परवानगी देणे आवश्यक राहील. गावातील रहिवासी व शेतकऱ्यांना जलसंधारण, जिल्हा परिषद व ग्रामपंचायतीच्या मालकीचे तलाव किंवा महसुली नाल्यांमधून माती, दगड, खडक किंवा मुरूम काढता येईल, परंतु यासाठी संबंधित विभागाच्या सक्षम अधिकाऱ्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

# मतदार समाविष्ट व्हावेत

लोकशाहीत निवडणुका आवश्यक आहेत. त्यासाठी मतदार यादी निर्दोष असणे गरजेचे जरूर आहे. मतदानाच्या घटनात्मक हक्कापासून एकही मतदार वंचित राहणार नाही याची काळजी आयोगाने घेतली पाहिजे.

मतदार याद्यांच्या विशेष तीव्र पडताळणी मोहिमे अंतर्गत महाराष्ट्रात व पुण्यात मतदारांशी संपर्क साधण्यास सुरुवात झाली आहे. या मोहिमेचा हा तिसरा टप्पा आहे. यात १६ राज्ये व तीन केंद्रशासित प्रदेशातील सुमारे ३७ कोटींपेक्षा जास्त मतदारांची पडताळणी होणार आहे. गेल्या ३० मे पासून हा तिसरा टप्पा सुरू झाला. काही राज्यांत जूनच्या प्रारंभापासूनच त्यास सुरुवात झाली आहे. गेल्या वर्षी बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीपूर्वी मतदार यादी सुधारण्याची 'विशेष तीव्र' मोहीम सुरू झाली. तिच्या अंमलबजावणीतील अनेक दोष त्या वेळी समोर आले होते. बिहारमधील सुमारे ६५ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली होती. मोहिमेच्या दुसर्या टप्प्यात ९ राज्ये व तीन केंद्रशासित प्रदेशांत ती राबवली गेली. त्यात आधीच्या मतदार यादीतील सुमारे १०.२ टक्के नावे वगळली गेली. ही संख्या ६ कोटींपेक्षा जास्त भरते. पश्चिम बंगाल मधील ही मोहीम जास्त गाजली. तेथे सुमारे ९० लाखांपेक्षा जास्त नावे बाद ठरली. आधीच्या निवडणुकांमध्ये मतदान केलेल्या, ओळख पत्रे असलेल्या मतदारांची नावे वगळली गेली. अल्पसंख्याकांची संख्या त्यात जास्त आहे हे लक्षणीय आहे. सर्वो

गेल्या विधानसभा/महापालिका किंवा दोन्ही निवडणुकांमध्ये मतदान केलेल्या युवक/युवतीचे नाव २००२-०४ च्या यादीत नसेल तर त्या मतदाराचा अर्ज ग्राह्य धरणार का? मतदारांच्या नातलगांचे नाव २००२-०४ च्या यादीत होते की नव्हते हेही तपासले जाणार आहे. हे 'नातलग'कोणते? ते आयोगाने स्पष्ट केलेले नाही. नोकरी-व्यवसायासाठी एखाद्या गावात किंवा शहरात आलेल्या व्यक्तीचा कोणता पत्ता स्वीकारला जाईल? बिहार तसेच पश्चिम बंगालमधील पडताळणीत हा मुद्दा चर्चेत होता. स्थलांतरित व्यक्तीचा मतदार या नात्याने दर्जा काय आहे हे समजलेले नाही. माहितीचे व निर्णयाचे केंद्रीकरण हा या मोहिमेतील एक दोष आहे. 'बीएलओ'ने जमा केलेल्या माहितीच्या आधारावर मतदाराचे नाव सुधारित यादीत समाविष्ट करायचे की नाही याचा निर्णय दिल्लीत घेतला जाणार आहे. त्यासाठी गाव/शहर पातळीवर किंवा राज्य पातळीवर अधिकारी का नेमला जात नाही? पश्चिम बंगालमध्ये अनेक नावे वगळण्यासाठी आयोगाने 'लॉजिकल डिस्क्रिपन्सी'-तार्किक विसंगती/तफावत-असे कारण दिले. मतदार यादी सुधारणेत हा शब्द प्रयोग प्रथमच वापरला गेला.




च्च न्यायालयाने हस्तक्षेप केल्यानंतर निवडणूक आयोगाने लवाद नेमले. त्यांच्या समोर सुमारे २३ लाख मतदारांचे अर्ज अजूनही पडून आहेत. आता महाराष्ट्रात काय होणार?

पारदर्शकता हवी

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार 'बूथ पातळीवरील अधिकारी'-बीएलओ-मतदारांच्या घरी भेट देऊन माहिती गोळा करणार आहेत. आयोगाने तयार केलेल्या अर्जात मतदारांची माहिती भरलेली असणार आहे. त्या माहितीची खातरजमा करून ती योग्य असल्याचे मतदाराने 'जाहीर' करायचे आहे. २००२-०४ मध्ये अशी पडताळणी मोहीम पार पडली होती. त्यातील माहितीशी/त्या यादीशी नवी माहिती जुळत असल्याची खात्री आयोग करणार आहे. मग त्याचे/तिचे नाव नव्या अथवा 'सुधारित' यादीत समाविष्ट होणार आहे. बिहारमध्ये 'आधार'कार्ड सक्तीचे असल्याचे म्हणणारा आयोग आता आधार क्रमांक देणे 'स्वेच्छेची' बाब असल्याचे सांगत आहे. त्याचा नेमका अर्थ आयोगाने सांगितलेला नाही. तिसर्या टप्प्यात असे होणार नाही अशी अपेक्षा आहे; पण त्याची खात्री नाही. आपण पात्र मतदार आहोत हे सिद्ध करण्याची जबाबदारी नागरिकांवर टाकण्यात आली आहे हाही या मोहिमेतील दोष आहे. मतदारांमधील स्त्रिया व पुरुषांच्या संख्येत अनेक राज्यांत अनाकलनीय तफावत आढळल्याने पडताळणीसाठी वापरल्या गेलेल्या 'सॉफ्टवेअर' बद्दलही आरोप झाले होते. विधानसभा निवडणुकीच्या मतदारांच्या यादीनुसार राज्यात ९ कोटी ६४ लाखांपेक्षा जास्त मतदार होते. विशेष तीव्र पडताळणीनंतर ती किती कमी होते, हे पाहावे लागेल. जास्तीत जास्त पात्र मतदारांची नावे समाविष्ट करणे हा या सुधारणेचा हेतू असला पाहिजे.

# आणि युद्धाला तोंड फुटले...



**भावार्थ रामायणातील कथा,**

अंगदाने रावणाचा हिसकावून आणलेला मुगुट, रामाने आपल्या हातांनी बिभीषणाच्या मस्तकावर ठेवला. त्या मुगुटामुळे बिभीषणच्या चेहर्यावर राज्यपट मिळाल्यासारखे तेज आले. रामाने वानरांना आज्ञा केली की बिभीषणाच्या मस्तकावर राजछत्र धरा. त्या बरोबर बिभीषणाच्या मस्तकावर राजछत्र धरण्यासाठी वानरांच्यात धावपळ सुरू झाली. राम स्वत: छत्रधारी नसताना आपल्या शिरी छत्र धरू नये असे बिभीषणाने निक्षून सांगितले.

आता युद्धाशिवाय पर्याय उरला नसल्यामुळे राम लक्ष्मणासह लंकेच्या उत्तर द्वाराच्या दिशेने निघाला. रामाने ठरवून दिलेल्या पद्धतीप्रमाणे युद्धासाठी वानरसैन्य तयार झाले. रामाज्ञे प्रमाणे

सुग्रीवाचे नळ, नीळ, जांबवंत, अंगद, हनुमान, गज, गवाक्ष, गवय, शरभ, ऋषभ, गंदमादन, भीम, दधिमुख, सुषेण, केसरी, पनस असे सगळे शूरवीर, शक्तिशाली, पराक्रमी योद्धे त्यांचे बाहू फुरफुरू लागले. रामाची आज्ञा होताच त्यांनी लंकादुर्गाहून उंच ठिकाणांहून मोर्चे लावून रामनामाचा जयजयकार करीत लंकेवर दगड, धोंडे, शिळा यांचा वर्षाव सुरू केला. रावणानेही आपल्या सैन्याची योजना करून त्यांना वानर सेनेवर हल्ला करण्याची आज्ञा दिली. हजारो, लाखो राक्षसगण लंकाधीशाच्या नावाचा जयजयकार करीत युद्धासाठी बाहेर पडले.

मोठमोठ्या झाडाच्या फांद्या, मोठे वृक्ष, दगड, शिळा तसेच परिघ (म्हणजे लोखंडी गदेच्या आकारासारखे असते) ही रामसेनेची महत्त्वाची आयुधे होती तर बाण, भाले, तोफगोळे, तोमर (म्हणजे गदा किंवा भाला या सारखे शस्त्र) अशी विविधप्रकारची आयुधे रावणसेनेकडे होती. आपापल्या आयुधांचा वापर करताना सैन्याच्या शारीरिक मर्यादाही होत्या. राक्षसांना हवेत इकडून तिकडे उड्या मारीत युद्ध करणे शक्य नव्हते. मात्र चपळ वानरांना ते सहज शक्य होते. किंबहुना वानरांचे नैसर्गिक वागणेही तसेच होते. वानरांचा स्वभाव युद्धासाठी त्यांना सहाय्यकारी हेता. राक्षसांकडे मायावी शक्ती होती, तर अशा प्रसंगी वानरांच्या मागे उभी राहणारी रामशक्ती होती.

घनघोर युद्ध सुरू-युद्धाला तोंड फुटले आणि रावणाकडचे नावाजलेले निशाचर आणि राम सैन्यातील पराक्रमी योद्धे यांच्यात घनघोर युद्ध सुरू झाले. इंद्रजीत आणि अंगद तर रावणाचा दुसरा मुलगा अतिकाय आणि रंभुवानर, तसेच महोदर आणि सुषेण, जंबुमाळी राक्षस आणि हनुमान, तपन आणि नळ, कुंभकर्णाचा मुलगा कुंभ आणि जांबवंताचा भाऊ धूर्माक्ष, प्रघसा आणि सुग्रीव, विरूपाक्ष आणि लक्ष्मण, अशा महत्त्वाच्या चौवीस पराक्रमी, शक्तिशाली वीरांच्या जोड्या एकमेकांना झुंझीसाठी भिडल्या. कुणी एकमेकांवर शस्त्रांचे आघात करीत होते तर कोणी एकमेकांवर अस्त्रांचे प्रयोजन करीत होते.

रणवाद्यांच्या कडकडाटामध्ये, मोठमोठ्याने आरोळ्या देत, एकमेकांवर धावून जात, एकमेकांवर आघात प्रतिघात करणे चालले होते. अंगदाने इंद्रजीताच्या रथावर उडी घेत, त्याच्या रथाची घोडी मारली, सारथी मारला, त्याच्या रथाचा पूर्ण विध्वंस केला. त्यांच्यात द्वंद्वयुद्ध सुरू झाले. अंगदाने त्याचा मुगुट उडवून लावला. अंगदापुढे आपला टिकाव लागणे शक्य नाही असे इंद्रजीताला जाणवू लागले. अंगदाच्या हल्ल्यातून सुटका करून घ्यावी असे त्याच्या मनात आले. तोपर्यंत अंगदाने इंद्रजीताचे केस हातात पकडले होते. धरलेल्या केसांनी इंद्रजीताला हिसडा मारण्याच्या विचारात अंगद असतानाच, अंगदाने धरलेल्या आपल्या केसांचा बुचडा मोठ्या चपळाईने इंद्रजीताने स्वत:चे हाताने कापला आणि अंगदाच्या हातून आपली सुटका करून घेतली. जिवाच्या भयाने तो अंतर्धान पावला. संपातीने अश्वकर्ण नावाचा भलामोठा वृक्ष हाती घेऊन त्याच्या घावांखाली प्रजंघ या राक्षसाला मूर्छित केले. रावणपुत्र अतिकाय हाही रंभू वानराने केलेल्या शिळांच्या माराने मूर्छित होऊन पडला. महोदर हा राक्षस आणि सुषेण यांच्यातही घनघोर युद्ध झाले. मात्र महोदर याचे पाच बाण सुषेणाचे मर्मावर लागले. त्याच्या प्राणांवरच ते बेतले होते. सुषेणाचे अंतर्यामी सतत रामस्मरण चालत असे. जिथे रामस्मरण चालू असते तिथे मरणाला स्थान नसते. केवळ या रामस्मरणाने सुषेणाचा जीव वाचला. विरुपाक्ष आणि लक्ष्मण यांचेही घनघोर धनुर्युद्ध झाले. विरूपाक्ष याचा लक्ष्मणापुढे अजिबात टिकाव लागला नाही. लक्ष्मणाच्या एका बाणाने विरूपाक्ष निष्प्राण झाला. असे हातघाईचे जागोजाग युद्ध चालू होते. अनेक राक्षस मरून पडत होते. रणभूमीवर रक्तमांसांचा चिखल झाला होता. आरडा, ओरडा, जयघोष, आणि किंकाळ्या यांनी आकाश दुमदुमत होते. रावणाच्या सैन्यात यज्ञकेत, शतन्घ, रश्मिकेत, आणि यज्ञकोपन नावाचे चार महा बलाढ्य गाढे वीर होते. **- विलास अत्रे**

# जेवणानंतर ग्रीन टी प्यायल्याने झपाट्याने वजन कमी होऊ शकते?



ग्रीन टी आरोग्यासाठी खजिना मानला जातो, म्हणून बहुतेक आरोग्य तज्ज्ञ ते पिण्याचा सल्ला देतात. पण जेवणानंतर ग्रीन टी प्यायल्याने वजन कमी होऊ शकतो का? जाणून घ्या...वाढते वजन ही एक सामान्य समस्या झाली आहे. सगळे जण वजन कमी करण्यासाठी प्रयत्न करताना दिसून येत आहे. या समस्येतून लवकरात लवकर बाहेर पडण्यासाठी लोक नानाविध घरगुती उपायसुद्धा वापरताना दिसतात. तुम्हाला माहीत आहेच की, वजनवाढीच्या समस्येला चुकीची आहारशैली, झोपेची चुकीची वेळ आणि आपल्याच काही वाईट व अनारोग्यकारक सवयी कारणीभूत असतात. वजन वाढल्यानंतर आपल्याला अनेकांकडून ग्रीन टी पिण्याचा सल्ला दिला जातो. विशेष म्हणजे ग्रीन टी हे पाण्यानंतर जगभरातील सर्वांत प्रसिद्ध पेय बनलं आहे. ग्रीन टीमध्ये न्यूट्रिशन आणि अँटीऑक्सिडंट्स घटक असतात. ग्रीन टी आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर असून, त्यामुळे अनेक समस्यांपासून सुटका होते. ग्रीन टीमुळे चयापचय सुधारते, पचन चांगल्या प्रकारे होऊन वजन कमी होण्यासही मदत होते. ग्रीन टी पिण्याचे प्रमाण, तसेच वेळ यांबाबत योग्य काळजी घेतल्यास तुम्हाला ग्रीन टीचा भरपूर लाभ घेता येऊ शकतो. जेवल्यानंतर ग्रीन टी प्यायल्यास झपाट्याने वजन कमी होऊ शकते का, याच विषयावर मुंबई येथील कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटलच्या सल्लागार व आहारतज्ज्ञ प्रतीक्षा कदम यांनी माहिती दिल्याचे वृत्त प्रतीक्षा कदम यांनी दी इंडियन एक्स्प्रेसने

# पावसाळ्यात दूषित पाणी कसे ओळखावे?




पावसाळ्यात होणारे बहुतांश विकार हे दूषित पाण्याशी संबंधित असतात. अशा वेळेस दूषित पाणी कोणते ते आपण ओळखू शकलो आणि ते पाणी टाळले तर त्यातून होणाऱ्या विकारांना आळा घालता येईल.पावसाळ्यात आजार वाढण्याचे सर्वात प्रमुख कारण म्हणजे दूषित पाणी. पावसाळ्यात आकाशातून पडलेले पाणी जमिनीवर पडल्यानंतर जमिनीवरील विविध अशुद्ध घटक पाण्यात मिसळल्यामुळे त्याचप्रमाणे नद्या वाहू लागल्यावर नद्यांच्या पात्रामधील व तीरांवरील विविध प्रकारच्या अशुद्धी मिसळल्यामुळे आणि आजच्या जगात सर्व टाकाऊ पदार्थ पाण्यातच फेकले जात असल्याने नद्यांचे व इतर जलस्रोतांचे सुद्धा पाणी अशुद्ध होते. हेच दूषित पाणी विविध आजारांना कारणीभूत होते.दूषित पाण्याची चरकसंहितेनुसार परीक्षा 'पाणी प्रदूषित का होते व प्रदूषित पाणी कसे ओळखावे', याचे इसवी सनाच्या एक हजार वर्षे इतक्या प्राचीन काळामध्ये आयुर्वेदाने केलेले मार्गदर्शन आजही उपयोगी पडण्यासारखे आहे. ते पुढीलप्रमाणे

१) जे पाणी विचित्र गंधाचे असेल (ज्याला अतिशय वेगळा वास येत असेल) २) ज्या पाण्याचा रंग बदललेला असेल ३) ज्याची चव बदललेली असेल

४) ज्या पाण्याचा स्पर्श विचित्र-वेगळा असेल.५) जे पाणी पाहूनच किळस येत असेल.६) ज्यामध्ये अत्याधिक क्लेद असेल अर्थात जे बुळबुळीत झाले असेल७) ज्या पाण्यामध्ये तंतू (धागे) सुटत असतील.८) ज्या पाण्यापासून पक्षी दूर जात असतील.९) ज्या पाण्यामधील बेडूक, मासे, कासव वगैरे जलचर प्राणी अतिशय कृश झाले आहेत, असे नजरेस पडेल.१०) ज्या पाण्यामधील बेडूक, मासे, कासव आदी जलचर मरत असतील.असे पाणी विकृत आहे असे ओळखून ते आरोग्यासाठी घातक समजावे

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



वैवाहिक जीवन आरोग्यासाठी चांगले मानले जाते. पण हे सुद्धा खूप आवश्यक आहे कि सेक्स चा आनंद घेण्यासाठी योग्य मार्ग जाणून घेतला पाहिजे. या लेखात दिलेल्या सोप्या टिप्स चा वापर करून तुम्ही तुमचे सेक्स लाइफ मध्ये सुधार आणू शकता. पुरुष असो किंव्हा स्त्री त्यांना या गोष्टीची माहिती हवी असली पाहिजे कि आपला पार्टनर खुश कशामुळे होतो. आणि ते कामक्रिडा करताना कोणत्या क्रियेमुळे जास्त एन्जाँय करू शकतो.

## २ Joke विनोद





शुशांत आपल्या हातातली वस्तू उत्साहाने दाखवीत आईला म्हणाला, ङ्गआई, ही बघ मी सतार बनवलीय.फ ङ्गअरे वा! फारच छान..पण ह्या तारा कुठून आणल्यास तू?फ्तुझ्या सतारीच्या तोडून घेतल्या.फ शुशांत म्हणाला.

## ३ Message संदेश



Nazroo se jab nazar ka
takrar hota hai,
har mod par kissi ka in-
tezaar hota hai,
dil rota hai zakham haste
hai,isi ka naam to pyaar
hota hai

## ४ Thought सुविचार




चिंतनशील विचारातून आत्मविश्वास निर्माण होतो.
- अज्ञात

**संस्कृत सुभाषित**

दृष्टिपूतं न्यसेत् पादं, वस्त्रपूत पिबेज्जलम्।।
सत्यपूतां वदेद् वाचं, मन:पूतं समाचरेत्।।

अर्थः नीट पाहूनच जमिनीवर पाऊल ठेवावे, पाणी नेहमी वस्त्रातून गाळून घ्यावे, सत्याने पवित्र झालेले वचन बोलावे, मनाला जे पवित्र आणि सत्य वाटेल तसे वर्तन करावे.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



**आडवे शब्द**

१. रावसाहेब रामराव - अर्थात गृहमंत्री आबांचे नाव
६. पोलिसांवरील अधिकारी
९. ही धरून लगडी घालतात
११. छिद्र, जखम
१२. जय पराजय
१४. घोंगड्या विणणारी जमात
१६. मोठा हातोडा
१७. रम्य दृश्य
१९. धमनी
२१. मला
२४. उपहास
२५. शरीर
२७. खरकट्याचा ढीग
२९. श्रीकृष्णाचे एक नाव
३१. वचक, भीती
३२. हिंदीत शरीर
३३. बारीक झिणझिण
३५. वाक्बगार
३७. अभिमन्यूला ठार मारणारा
३९. फायदा
४०. दहा अब्ज ही संख्या
४१. लाज
४३. रसाळ
४५. मूळ अर्थ शहाणा, सुंदर आणि प्रचलित अर्थ शहरी
४६. जाणे-येणे, वहिवाट
४८. पायताण
४९. सीतेची जुळी मुले
५१. खदक
४३. म--- रे झूठ मत बोलो, खुदा के पास जान हैफ
५४. पौराणिक आयुध
५५. ओझी उचलणारा
५७. सत्त्व
५९. जोखीम
६१. वाई-महाबळेश्वरमधील प्रसिद्ध घाट
६२. पोहणे
६४. गवताचे रुंद पान
६५. निवासस्थान
६६. मत देणारा
६८. उत्पन्नातील सरकारी हिस्सा
६९. भित्रा, पळ काढणारा
७०. कुलीन
७२. जाणकार
७५. पालव
७७. ढीग
७९. रक्तवाहिन्या
८०. जमीनदार
८१. कमीतकमी, निदान एवढे तरी!

**उभे शब्द**

१. संरक्षण
२. बाहेरच्या विरूद्ध
४. धरणातील पाणीसाठ्याचा प्रदेश
५. छोटी
६. सैनिक
७. जपणे
८. आवड
९. घट्ट, तणावाची स्थिती
१०. उष्ण
१३. प्रजा
१५. दृष्टीभेट
१६. गर्द, गच्च
१८. वेगाने
२०. शीतपेय
२२. सोनिया गांधी यांचे दिल्लीतील निवासस्थान या मार्गावर आहे
२३. खरे तर हे काही जेवण नव्हे!
२६. सापाला कधी धाकला म्हणू नये आणि याला आपला!
२८. माज
३०. आवाज, गोंगाट
३४. डोळ्यात तेल घालून करण्याचे काम
३५. विनाश
३६. राजालाही इथे नतमस्तक व्हावे लागते
३८. मृत्यूचा राजा
४१. संभवनीय
४२. पारशी जनतेचा वर्षारंभ दिन
४४. नूतन
४७. माळी, बागवान
५०. काढलेली खोडी
५२. जाडसर पीठ
५३. सर्व
५४. मारुती, भीम
५५. हिंदुस्थानी
५६. उपस्थित
५८. उत्सवाचे दिवस
६०. च्या बद्दल
६३. तरतूद
६४. साडी
६५. जात्याचा आवाज
६६. मधुमक्षिका
६७. शील, उदारता
६८. गव्हाचे बारीक पीठ
६९. पुन्हा
७१. नवरा
७३. नवरत्नांपैकी एक
७४. खेडे
७६. फितुरी
७७. भूपती
७८. माळ, हार

**आडवे उत्तर**

१.आर.आर. पाटील ६.फौजदार ९.तंगडी ११.क्षत १२.हारजीत १४.सनगर १६.घण १७.विलोभनीय १९.नस २१.मज २४.टर २५.तन २७.रमराट २९.दामोदर ३१.धाक ३२.बदन ३३.रवरव ३५.सराईत ३७.जयद्रथ ३९.लाभ ४०.खर्व ४१.शरम ४३.रसवान ४५.नागर ४६.राबता ४८.वहाण ४९.लवकुश ५१.चर ५३.सजन ५४.गदा ५५.भारवाहक ५७.कस ५९.जबाबदारी ६१.पसरणी ६२.जलतरण ६४.पात ६५.घर ६६.मतदार ६८.आयकर ६९.पळपुटा ७०.घरंदाज ७२.माहितगार ७५.पदर ७७.रास ७९.शीरा ८०.वतनदार ८१.गेला बाजार

**उभे उत्तर**

१.रक्षण ३.आत ४.पाणलोट ५.लहानी ६.फौजी ७.जतन ८.रस ९.तंग १०.गरम १३.रयत १५.नजरानजर १६.धनदाट १८.भरधाव २०.सरबत २२.जनपथ २३.उदरभरण २६.नवरा २८.मद ३०.रव ३४.रखवालदारी ३५.सर्वनाश ३६.ईश्वरचरणी ३८.यमराज ४१.शक्य ४२.नवरोज ४४.नव ४७.बनकर ५०.कुरापत ५२.रवा ५३.सकल ५४.गदाधर ५५.भारतीय ५६.हजर ५८.सणवार ६०.बाबत ६३.तजवीज ६४.पातळ ६५.घरघर ६६.मधमाशी ६७.दानत ६८.आटा ६९.परत ७१.दादला ७३.हिरा ७४.गाव ७६.दगा ७७.राजा ७८.सर



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### इंग्लंड दौऱ्यानंतर भारताच्या नव्या मालिकेच वेळापत्रक जाहीर, कधी आणि कुठे होणार मॅचेस?

दिल्ली–टीम इंडिया सध्या इंग्लंड दौऱ्यावर आहे. या दौऱ्यात टीम इंडिया पाच सामन्यांची टी२० मालिका आणि तीन सामन्यांची वनडे मालिका खेळते आहे. या मालिकेनंतर पुढे काय असा प्रश्न अनेक चाहत्यांना पडला होता.तर भारताच्या नव्या मालिकेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे टीम इंडिया नेमक्या कोणत्या दौऱ्यावर जाणार आहे. तसेच या दौऱ्यात टीम इंडिया किती सामने खेळणार आहे? हे जाणून घेऊयात.
खरं तर इंग्लंड दौऱ्यानंतर टीम इंडिया झिम्बाबे दौऱ्यावर जाणार आहे.या दौऱ्यात टीम इंडिया तीन सामन्यांची टी२० मालिका खेळणार आहे.त्यानंतर ऑगस्टमध्ये टीम इंडिया श्रीलंका दौऱ्यावर जाणार आहे. टीम इंडियाचा हा दौरा नियोजित होता,फक्त सामन्यांच्या तारखा जाहीर नव्हत्या. पण आज श्रीलंका बोर्डाने या तारखा जाहीर केल्या आहेत. श्रीलंकन क्रिकेट बोर्डाने आज भारतीय संघाच्या कसोटी सामन्याचे वेळापत्रक जाहीर केले आहे. शुभमन गिलच्या नेतृत्वात टीम इंडीया १५ ऑगस्ट २०२६ पासून श्रीलंकेत दोन कसोटी सामने खेळेल.

### चालू सामन्यात तिघांचा धुडगूस; सामना थांबवण्याची वेळ, विश्वचषकात सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

,२ जुलै (पीएसआय)
जगभरामध्ये फुटबॉल चाहते असो किंवा क्रिकेट चाहते अनेकदा त्याच्या आवडत्या खेळाडूंना भेटण्यासाठी नेहमीच उत्साही पाहायला मिळतात. भारतामध्ये क्रिकेट खेळाडूंना अनेक चाहते हे देवासारखे पूजतात तर जगभरामध्ये असे काही फ ुटबॉल खेळाडू आहेत त्यांना चाहते हे सर्वस्व मान–तात. आता सुरु असलेल्या फुटबॉल विश्वचषकाचा जगभरामध्ये चर्चा पाहायला मिळत आहे. तीन देशांनी या स्पर्धेचे संयुक्तपणे आयोजन केले आहे, फ ुटबॉल विश्वचषक २०२६ मध्ये राऊंड ऑफ ३२ चे सामने हे सुरु आहेत.आता बाद फेरीचे सामने सुरु होते आणि बुधवारी बेल्जियम आणि सेनेगल यांच्यामध्ये राउंड ऑफ ३२ चा सामना पार पडला, या सामन्यामध्ये स्टेडियममध्ये एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बेल्जियम आणि सेनेगल यांच्यामध्ये विश्वचषकाचा सामना सुरु असताना सामन्यादरम्यान तीन जण मैदानात अचानक घुसले. ज्यामुळे काही काळ खेळ थांबवावा लागला होता.

### अखेरच्या ३ मिनिटात मॅच फिरवली, वादग्रस्त पेनल्टीने बेल्जियमची प्री-क्वार्टर फायनलमध्ये धडक

सिएटल–फिफा विश्वचषक २०२६ मध्ये बेल्जियमने स्पर्धेतील सर्वात थरारक कमबॅकपैकी एक नोंदवत सेनेगलचा अतिरिक्त वेळेत ३–२ असा पराभव केला आणि राउंड ऑफ १६ (प्री–क्वार्टर फायनल) मध्ये प्रवेश केला.सिएटल येथील ल्यूमेन फील्ड स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात रोमांच शिगेला पोहोचला. सामन्याच्या ८६व्या मिनिटापर्यंत बेल्जियमचा संघ ०–२ असा पिछाडीवर होता. त्यामुळे सेनेगल सहज विजय मिळवून प्री–क्वार्टर फायनलमध्ये प्रवेश करेल, असे जवळपास निश्चित मानले जात होते. मात्र अखेरच्या काही मिनिटांत बेल्जियमने अप्रतिम खेळ करत सामना पूर्णपणे आपल्या बाजूने फिरवला.बेल्जियमकडून पहिला गोल रोमेलू लुकाकूने ८६व्या मिनिटाला केला. त्यानंतर युरी टिलेमन्सने ८९व्या मिनिटाला बरोबरीचा गोल झळकावला. अतिरिक्त वेळेच्या १२५व्या मिनिटाला मिळालेल्या पेनल्टीवर टिलेमन्सने पुन्हा गोल करत बेल्जियमला ३–२ असा ऐतिहासिक विजय मिळवून दिला आणि सामना निर्णायक ठरवणारा गोल ठरला.

### मिस्टर ३६० स्टाईलने धुमाकुळ घातला

मुंबई –टीम इंडियाचा दिग्गज क्रिकेटपटू राहुल द्रविड याच्या थोरल्या मुलाने पुन्हा एकदा मैदान गाजवलं आहे.समित द्रविडने मैदानात चौफेर फटकेबाजी करून सगळ्यांचे लक्ष वेधून घेतलं आहेत. खरं तर राहुल द्रविडला क्रिकेट जगतात मद वॉलफम्हण–तात, मात्र त्याचा पोरगा ममिस्टर ३६०फनिघाला आहे.त्यामुळे त्याच्या फलंदाजीची प्रचंड चर्चा रंगली आहे. विशेष म्हणजे समितच्या या खेळीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.
खरं तर सध्या महाराजा ट्रॉफी ही स्पर्धा खेळ–वली जात आहे. या स्पर्धेत राहुल द्रविडचा लेक समित द्रविड हा कल्याणी बंगळुरु ब्लास्टर्स संघातून खेळतो आहे. काल बुधवारी कल्याणी बंगळुरु ब्लास्टर्स आणि हुबळी टायगर्स यांच्यात सामना खेळवला गेला होता. या सामन्यात समित द्रविड जबरदस्त फलंदाजी केली होती.कल्याणी बंगळुरु ब्लास्टर्स संघातून खेळताना समितने २३ बॉलमध्ये ३२ धावांची खेळी केली होती. या खेळीत त्याने ६ खणखणीत चौकार मारले होते. त्याचे हे चौकार पाहून त्याने राहुल द्रविडच्या विपरीत फलंदाजी केली होती.राहुल द्रविडची बॅटिंग टेक्निकल मानली जाते.

# सर्व ४८ संघ होणार मालामाल!

## फिफा वर्ल्डकप जिंकणाऱ्या संघाला किती रक्कम मिळणार?



फिफा वर्ल्डकप स्पर्धेतील नॉकआऊट फेरीतील सामन्यांना सुरुवात झाली आहे. दरम्यान विजेत्या आणि उपविजेत्या संघाला बक्षीस म्हणून किती रक्कम मिळणार? जाणून घ्या.
फिफा वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत आतापर्यंत एकापेक्षा एक रोमांचक सामने पाहायला मिळाले आहेत. या स्पर्धेतील राऊंड ऑफ ३२ फेरीतील सामने सुरू आहेत. लवकरच राऊंड ऑफ १६ फेरीतील सामन्यांना सुरुवात होणार आहे. या स्पर्धेच्या इतिहासात पहिल्यांदाच ४८ संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला आहे. त्यामुळे बक्षिसाची रक्कमही मोठी असणार आहे. दरम्यान विजेता, उपविजेता आणि नॉकआऊट फेरीत प्रवेश करणाऱ्या संघांना किती रक्कम मिळणार? जाणून घ्या.यावेळी फिफा वर्ल्डकप २०२६ स्पर्धेसाठी बक्षिसाची रक्कम ही वाढवण्यात आली आहे. आधी ही रक्कम ७२७ मिलियन डॉलर्स इतकी होती. पण एप्रिल महिन्यात फिफाकडून बक्षिसाची रक्कम वाढवण्यात आली होती. ही रक्कम ७२७ मिलियन डॉलर्सपर्यंत जाऊन पोहोचली आहे.विजेत्या संघाला किती रक्कम मिळणार? फिफा वर्ल्डकप जिंकणाऱ्या संघाला ५१ मिलियन डॉलर्स म्हणजेच भारतीय चलनानुसार ४३३ कोटी रुपये मिळतील. तर उपविजेत्या संघाला ३४ मिलियन डॉलर्स (२८९ कोटी रुपये) मिळणार आहेत. तर या स्पर्धेत तिसऱ्या स्थानी राहणाऱ्या संघाला ३० मिलियन डॉलर्स (२५५ कोटी रुपये) तर चौथ्या स्थानी राहणाऱ्या संघाला २८ मिलियन डॉलर्स (२३८ कोटी रूपये) इतकी रक्कम मिळणार आहे.नॉकआऊट फेरीत पोहोचणाऱ्या संघाला किती रक्कम मिळणार?
या स्पर्धेतील टॉप ८ मध्ये प्रवेश करणाऱ्या संघाला २० मिलियन डॉलर्स (१७० कोटी रुपये) मिळणार आहेत. तर राऊंड ऑफ १६ मध्ये प्रवेश करणाऱ्या संघाला १६ मिलियन डॉलर्स (१३६ कोटी रुपये) तर राऊंड ऑफ ३२ मध्ये प्रवेश करणाऱ्या संघाला १२ मिलियन डॉलर्स (१०२ कोटी रूपये) मिळणार आहेत. तर जे संघ राऊंड ऑफ ३२ मध्ये मध्ये प्रवेश करू शकले नव्हते, अशा संघांना १० मिलियन डॉलर्स ( ८५ कोटी रुपये) मिळणार आहेत. आतापर्यंत झालेल्या फिफा वर्ल्डकप स्पर्धेच्या इतिहासातील ही सर्वोच्च रक्कम आहे.यासह फिफाकडून सर्व ४८ संघांना १६८ मिलियन डॉलर्स दिले जाणार आहेत. प्रत्येक संघाला २.५ मिलियन डॉलर तयारीसाठी, सरावासाठी, प्रवासाचा खर्च आणि इतर खर्चासाठी दिले जाणार आहेत. यासह अतिरिक्त भत्ता दिला जाणार आहे. त्यामुळे वर्ल्डकप स्पर्धेसाठी पात्र ठरणाऱ्या प्रत्येक संघाला १२.५ मिलियन डॉलर्स म्हणजे १०६ कोटी मिळणार आहेत.



यूकेतील लंडन येथे सुरू असलेल्या विम्बल्डन टेनिस चॅम्पियनशिपमधील महिला एकेरीच्या पहिल्या फेरीतील सामन्यात खेळताना फ्रान्सची लोइस बोइसन.

## क्रमवारीत इशान किशन अव्वलस्थानी

दुबई : अभिषेक शर्माला मागे टाकत इशान किशन जगातील नंबर १ टी–२० फलंदाज बनला आहे. आयसीसीने आपली नवीन क्रमवारी जाहीर केली आहे, ज्यामध्ये भारताचा इशान किशन टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये जगातील नंबर १ फलंदाज बनला आहे.
आयसीसी नुकत्याच जाहीर केलेल्या क्रमवारीत भारतीय क्रिकेटचे वर्चस्व स्पष्टपणे दिसून येत आहे. टी–२० फलंदाजी क्रमवारीत एक मोठा उलटफेर करत भारतीय यष्टीरक्षक–फलंदाज इशान किशन जगातील नंबर १ फलंदाज बनला आहे. त्याने जवळपास वर्षभर हे स्थान टिकवून ठेवलेल्या आपल्याच संघातील सहकारी अभिषेक शर्माला अव्वल स्थानावरून खाली खेचले आहे. ताज्या आकडेवारीनुसार, या दोन भारतीय फलंदाजांमध्ये केवळ सात रेटिंग गुणांचा किरकोळ फरक आहे. यासह, विराट कोहली, सूर्यकुमार यादव आणि अभिषेक शर्मा यांच्यानंतर इशान किशन टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये अव्वल स्थानी पोहोचणारा चौथा भारतीय पुरुष फलंदाज ठरला आहे.
टी–२० विश्वचषकातील इशान किशनची प्रभावी कामगिरी–नुकत्याच संपन्न झालेल्या टी–२० विश्वचषक २०२६ मधील त्याच्या प्रभावी कामगिरीमुळे इशान किशन अव्वल स्थानी आहे. त्याने या स्पर्धेत जवळपास २०० च्या वेगवान स्ट्राइक रेटने ३१७ धावा केल्या. दरम्यान, नुकत्याच झालेल्या मालिकेत भारतावर ऐतिहासिक विजय नोंदवणार्या आयर्लंडनेही क्रमवारीत लक्षणीय प्रगती केली आहे.

**कसोटी क्रमवारीतही बदल**

क्रमवारीतील हा मोठा फेरबदल केवळ टी–२० क्रिकेटपुरता मर्यादित नाही, तर कसोटी क्रिकेटमध्येही एका नव्या राजाने प्रवेश केला आहे. ऑस्ट्रेलियाचा शक्तिशाली फलंदाज ट्रॅव्हिस हेड आपल्या कारकिर्दीत पहिल्यांदाच जगातील क्रमांक १ कसोटी फलंदाज बनला आहे. ट्रेंट ब्रिज येथे इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातील कसोटी सामन्यात इंग्लंडचे हॅरी ब्रूक आणि जो रूट यांना धक्का बसला. ब्रूक दुसर्या स्थानावर, तर रूट तिसर्या स्थानावर घसरला आहे.



## आगामी श्रीलंका दौऱ्यासाठी बीसीसीआयने केली घोषणा!

मुंबई–भारताचा संघ हा इंग्लंड दौऱ्यावर आहे, टीम इंडिया आता इंग्लंडविरुद्ध पाच सामन्यांची टी२० मालिका खेळणार आहे. तर त्याचबरोबर इंग्लंडविरुद्ध एकदिवसीय मालिकेचे देखील आयोजन केले आहे. त्यामुळे आता पुढील काही दिवस टीम इंडियाचे व्यस्त वेळा–पत्रक पाहायला मिळणार आहे. टीम इंडियाचे मागील काही दिवसांपासून सातत्याने सामने पाहायला मिळत आहेत. भारतीय संघ इंग्लंड दौऱ्यानंतर श्रीलंकेला जाणार आहे यामध्ये टीम इंडिया दोन कसोटी सामने खेळणार आहे. आता बीसीसीआयने टीम इंडियाच्या श्रीलंका दौऱ्यासाठी टीम वेळापत्रक जाहीर केले आहे. बीसीसीआयने जाहीर केलेल्या या मालिकेच्या संदर्भात सविस्तर माहिती या लेखामध्ये दिली आहे. भारतीय संघाची आगामी कसोटी मालिका ही यसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी) २०२५–२७ चक्रासाठी महत्व–ाची असणार आहे. यामध्ये दोन्ही संघासाठी ही मालिका महत्वाची असणार आहे, ज्यामध्ये दोन्ही संघ महत्त्वपूर्ण गुण मिळवण्याच्या उद्देशाने मैदानात उतरतील. श्रीलंका क्रिकेट बोर्डाने आता या मालिकेसाठी वेळापत्रक जाहीर केले आहे या मालिकेमध्ये दोन सामने कधी आणि कुठे खेळवले जाणार आहेत याबद्दल वाचा.
भारत विरुद्ध श्रीलंका यांच्यामध्ये होणाऱ्या कसोटी मालिकेचा पहिला सामना हा गॉल येथे खेळ–ला जाईल, तर दुसरा कसोटी साम ना २३ ऑगस्टपासून कोलंबो येथे खेळला जाईल. या मालिकेच्या पहिल्या सामन्याला सुरुवात ही १५ ऑगस्टपासून सुरुवात होणार आहे. पहिला कसोटी सामना १५ ते १९ ऑगस्ट दरम्यान ऐतिहासिक गॉल आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर रंगणार आहे. तर दुसऱ्या सामन्याबद्दल सांगायचे झाले तर कसोटी सामना २३ ते २७ ऑगस्ट दरम्यान कोलंबोच्या सिंहली स्पोर्ट्स क्लब (एसएस–सी) येथे खेळला जाईल. भारतीय वेळेनुसार हे दोन्ही सामने सकाळी १०.०० वाजता सुरु होणार आ–हेत.
भारताच्या संघाने २०२५ च्या अखेरीस दक्षिण आफ्रिकेविरुद्ध कसोटी मालिका खेळली होती यामध्ये टीम इंडियाला २–० असा पराभवाचा सामना करावा लागला होता. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये पोहोचण्यासाठी टीम इंडियाला आगामी मालिकांमध्ये विजय मिळवणे अनिवार्य असणार आहे.

## भारतीय संघ पुढील महिन्यात श्रीलंकेविरुद्ध दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळणार

नवी दिल्ली–भारतीय संघ पुढील महिन्यात श्रीलंकेविरुद्ध दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळणार आहे. या मालिकेच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. पहिला सामना १५ ते १९ ऑगस्ट दरम्यान गॉल येथे खेळला जाईल. दुसरा कसोटी सामना २३ ते २७ ऑगस्ट दरम्यान सिंहलीज स्पोर्ट्स(एग्हपतो एज्द्री)क्लबमध्ये खेळला जाईल. २०२५–२७ च्या जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या दृष्टीने भारतीय संघासाठी ही एक महत्त्व–पूर्ण मालिका आहे.भारतीय संघाने अफगाणिस्तानविरुद्ध एक कसोटी सामना खेळून जिंकला आहे. भार–ताची अलीकडील कसोटी कामगिरी खराब राहिली आहे. यामुळेच संघ जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत पाचव्या क्रमांकावर आहे. दुसरीकडे, श्रीलंका भार–तापेक्षा एक स्थान खाली सहाव्या क्रमांकावर आहे. २०२७ मध्ये डब्ल्यूटीसीच्या अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी भारताला आपले उर्वरित बहुतेक कसोटी सामने जिंकावे लागतील.भारत २०१७ नंतर प्रथमच कसोटी मालिकेसाठी श्रीलंकेचा दौरा करणार आहे. यापूर्वी, दोन्ही क्रिकेट मंडळांनी या दौऱ्यात तीन टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांचा समावेश करण्याच्या शक्यतेवर चर्चा केली होती. पण टी२०(ऊ२०) आंतरराष्ट्रीय मालिकेचा कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे, सध्या केवळ दोन कसोटी सामन्यांची मालिकाच निश्चित मानली जात आहे.
आतापर्यंत दोन्ही संघ ४६ कसोटी सामन्यांमध्ये एकमेकांसमोर आले आहेत. यापैकी भारताने २२ कसोटी सामने जिंकले आहेत, तर सात सामने अनिर्णित राहिले आहेत. १७ कसोटी सामने अनिर्णित राहिले आहेत. भारत २०१७ नंतर प्रथमच कसोटी मालिकेसाठी श्रीलंकेचा दौरा करणार आहे. यापूर्वी, दोन्ही क्रिकेट मंडळांनी या दौऱ्यात तीन टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांचा सम ावेश करण्याच्या शक्यतेवर चर्चा केली होती. या फॉरमॅटमध्ये दोन्ही संघ शेवटचे २०२१ – २२ मध्ये एकमेकांसमोर आले होते. भारताने श्रीलंकेला २–० ने पराभूत केले होते.



मेक्सिको येथे मेक्सिको सिटी फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या ३२ संघांच्या फेरीतील साम न्यात स्पर्धा करताना मेक्सिको आणि इक्वेडोरचे खेळाडू.

# सोशल मीडियावर मैत्री केली,नंतर अल्पवयीन मुलीवर लैंगिक शोषण

## स्टार क्रिकेटर तुरुंगात जाणार, नेमकं प्रकरण काय?

मुंबई–क्रिकेटर म्हटले तर फेम आलंच पण या फ ेमसोबत क्रिकेटरसोबत अनेक घटना घडतात. काही क्रिकेटर फिक्सिंगमध्ये फसतात, तर काहींवर फसवणुकाचे आणि लैंगिक शोषणाचे आरोप होत असतात.अशीच एक घटना आता क्रिकेट जगतातून समोर आली आहे. या घटनेत एका क्रिकेटरने एका अल्पवयीन मुलीशी सोशल मीडियावर मैत्री करून तिचं लैंगिक शोषण केल्याची घटना घडली आहे. विशेष म्हणजे या आरोपांची क्रिकेटरने कबुली देखील दिली आहे, त्यामुळे त्याला आता तुरुंगवास होण्याची शक्यता आहे.
हा खेळाडू दुसरा तिसरा कुणी नसून ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज ॲरॉन समर्स आहे. ॲरॉन समर्सने अल्पवयीन मुलीच्या लैंगिक शोषणाच्या गंभीर आरोपाखाली आपला गुन्हा कबूल केला आहे. आता त्याला दीर्घकाळ तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. टास्मानियाचे सर्वोच्च न्यायालय ऑगस्टमध्ये या प्रकरणावर अंतिम निकाल देईल.
न्यायालयाच्या कागदपत्रांनुसार, हे प्रकरण २०१८ सालचे आहे, जेव्हा तो होबार्ट हरिकेन्स संघाचा भाग होता. त्याच्यावर आरोप आहे की त्याने सोशल मीडियाद्वारे एका अल्पवयीन पीडितेशी संपर्क साधला आणि त्यानंतर तिचे लैंगिक शोषण केले. जूनच्या अखेरीस, समर्सने आपला जबाब बदलला आणि तीन गंभीर आरोपांमध्ये आपला गुन्हा कबूल केला.क्रिकेटपटूचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कॅरोलिन ग्रीव्हज यांनी न्यायालयाला सांगितले की, घटनेच्या वेळी त्यांचा पक्षकार एका अत्यंत कठीण मानसिक परिस्थितीतून जात होता. तो सामाजिकदृष्ट्या एकाकी पडला होता आणि आपला बहुतेक वेळ सोशल मीडियावर घालवत होता. वकील म्हणाल्या, ''ही घटना त्याच्या मनातून कधीच जाणार नाही, पण त्याला त्याच्या आयुष्यात पुढे जाण्याची संधी दिली पाहिजे.''
कॅरोलिन ग्रीव्हज यांनी असेही सांगितले की, त्यावेळी ॲरॉन समर्सला ऑस्ट्रेलियन सर्किटमधील सर्वात वेगवान गोलंदाजांपैकी एक मानले जात होते आणि त्याला भविष्यातील स्टार म्हणून पाहिले



जात होते. त्या पुढे म्हणाल्या, ''ऑस्ट्रेलियामध्ये किंवा जगात इतरत्र कुठेही व्यावसायिक क्रिकेट खेळण्याचे त्याचे स्वप्न आता कायमचे संपले आहे, हे त्याला माहीत आहे.''दरम्यान ॲरॉन समर्सची ही पहिली गुन्हेगारी केस नाही.२०२१ मध्ये, अल्पवयीन मुलांच्या लैंगिक शोषणाचे चित्रण करणारी सामग्री बाळगणे आणि शेअर करण्याच्या एका वेगळ्या प्रकरणात त्याने आपला गुन्हा कबूल केला होता. त्या प्रकरणातही त्याला तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली होती. याचा अर्थ असा की, समर्सला यापूर्वीही बाल लैंगिक शोषणाशी संबंधित गुन्ह्यांमध्ये दोषी ठरवण्यात आले आहे. कॅरोलिन ग्रीव्हज यांनी न्यायालयाला निलंबित शिक्षेचा विचार करण्याचे आवाहन केले होते, परंतु न्यायाधीश हेलन वूड यांनी स्पष्ट केले की या प्रकरणात अशी सवलत शक्य नाही. यानंतर, न्यायालयाने ॲरॉन समर्सचा जामीन रद्द केला आणि त्याला न्यायालयीन कोठडीत पाठवले.आता त्याला ऑगस्टमध्ये शिक्षा सुनावण्यात येईल.३० वर्षीय ॲरॉन समर्सने बिग बॅश लीग (बीबीएल) मध्ये होबार्ट हरिकेन्सचे आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये टास्मानियाचे प्रतिनिधित्व केले आहे. त्याच्या वेगवान गोलंदाजीमुळे तो ऑस्ट्रेलियाच्या सर्वात प्रतिभावान वेगवान गोलंदाजांपैकी एक बनला होता. परंतु आता त्याची क्रिकेट कारकीर्द संपली आहे असे मानले जाते.उजव्या हाताचा वेगवान गोलंदाज ॲरॉन समर्सने सात लिस्ट ए सामने आणि तीन टी२० सामने खेळले आहेत. लिस्ट ए सामन्यांमध्ये समर्सने ७७.०० च्या सरासरीने पाच बळी घेतले आहेत, तर टी२० क्रिकेटमध्ये त्याला एकही बळी घेता आलेला नाही.

## सम्राट मित्रमंडळाच्या वतीने 'डॉक्टर्स डे' निमित्त शहरातील डॉक्टरांचा गौरव



**अहमदपूर/प्रतिनिधी:** 'डॉक्टर्स डे' निमित्त समाजसेवेसाठी सातत्याने कार्यरत असलेल्या वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर डॉक्टरांचा सम्राट मित्रमंडळ-लातूर, अहमदपूर यांच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

येथील शासकीय विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. चंद्रकांत उगीले हे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नागरगोजे, डॉ. उबेद जागीरदार, डॉ. जोशी, डॉ. मधुसूदन चेरेकर, डॉ. चलवदे, डॉ. अमृत चिवडे, डॉ. प्रवीण जगताप, डॉ. बेंबडे, डॉ. राजकुमार, डॉ. खडके आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सम्राट मित्रमंडळाचे संयोजक तथा युवक नेते डॉ. सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमामागील उद्देश स्पष्ट करत, समाजाच्या आरोग्यसेवेसाठी दिवस-रात्र कार्य करणाऱ्या डॉक्टरांविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी डॉ. मधुसूदन चेरेकर व डॉ. नागरगोजे यांनी मनोगत व्यक्त करत, डॉक्टरांविषयी समाजात वाढत असलेला विश्वास आणि आरोग्यसेवेतील जबाबदारी यावर मार्गदर्शन केले. उपस्थित डॉक्टरांनी अशा उपक्रमांचे कौतुक करून सम्राट मित्रमंडळाच्या सामाजिक बांधिलकीचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष गायकवाड यांनी केले, तर सचिन बानाटे यांनी आभार मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सामाजिक कार्यकर्ते मोहम्मद पठाण, आकाश पवार, अजय भालेराव तसेच सम्राट मित्रमंडळाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## लातूर शहरात नवीन नगर भूमापन कार्यालय कार्यान्वित

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर शहरातील नागरिकांना नगर भूमापन विषयक सेवा अधिक सुलभ आणि जलद गतीने उपलब्ध करून देण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. लातूर येथील जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांच्या अधिपत्याखाली शहरात नवीन नगर भूमापन कार्यालय सुरू करण्यात आले आहे.

हे नवीन कार्यालय खोरी गल्ली, सिल्वर ज्युब्ली रोडवरील मणियार बिल्डिंग येथे १५ जून २०२६ पासून कार्यान्वित झाले असून, नागरिकांसाठी सर्व प्रकारच्या सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या नवीन कार्यालयामार्फत आता लातूर शहरातील नगर भूमापन, मालमत्ता नोंदी, वारस हक्क नोंदी, जमिनींचे व मालमत्तांचे नकाशे, मोजणी तसेच इतर सर्व संबंधित शासकीय कामकाज हाताळले जाणार आहे. त्यामुळे लातूर मूळ गावभाग व शहरातील नागरिकांनी आपल्या नगर भूमापन विषयक कामांसाठी आणि चौकशीसाठी खोरी गल्ली येथील नवीन नगर भूमापन अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, तसेच या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन लातूरचे नगर भूमापन अधिकारी अशोक द. चव्हाण यांनी केले आहे.

## राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची विजया मेहता यांना श्रद्धांजली

**मुंबई/प्रतिनिधी:** ज्येष्ठ नाट्य निर्मात्या व दिग्दर्शिका विजया मेहता यांच्या निधनाबद्दल राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी दुःख व्यक्त केले आहे.

असामान्य प्रतिभा, दूरदृष्टी, प्रयोगशीलता आणि सृजनशीलतेच्या बळावर त्यांनी मराठी रंगभूमी आणि भारतीय चित्रपटसृष्टीला नवी उंची प्राप्त करून दिली. त्यांच्या कार्याचा ठसा नाट्य विश्वावर कायमस्वरूपी उमटला असून, त्यांचे कार्य भावी पिढ्यांना मार्गदर्शक ठरेल. राज्यातील गुणग्राहक रसिकांच्या वतीने मी दिवंगत विजया मेहता यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो, असे राज्यपालांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

# अपघातानंतर आर्थिक संकटात; मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी ठरला आधार

### अपघातानंतर १०० वर्षीय वृद्धेला अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्य मंजूर

**मुंबई/प्रतिनिधी:** गंभीर अपघातामुळे उपचारासाठी आर्थिक अडचणीत सापडलेल्या १०० वर्षीय सरूबाई मुंजवार यांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले. या सहाय्यामुळे त्यांच्यावर आवश्यक शस्त्रक्रिया वेळेत पार पडून पुढील उपचार तातडीने सुरू करणे शक्य झाले.

सरूबाई मुंजवार या रस्ता ओलांडत असताना भरधाव दुचाकीच्या धडकेत गंभीर जखमी झाल्या. या अपघातात त्यांच्या डाव्या मांडीला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर त्यांना फलटण (जि. सातारा) येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला. उपचारासाठी सुमारे सव्वा लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याने त्यांच्या कुटुंबासमोर आर्थिक अडचण निर्माण झाली.




नातेवाईकांच्या माध्यमातून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी योजनेची माहिती मिळाल्यानंतर रुग्णालयाच्या सहकार्याने २५ जून रोजी आर्थिक सहाय्यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीकडे अर्ज सादर करण्यात आला.

अर्ज प्राप्त होताच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाने आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून प्रकरणावर तातडीने कार्यवाही केली. अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्यास मंजुरी देण्यात आली. त्यामुळे उपचारात कोणताही विलंब न होता आवश्यक वैद्यकीय सेवा वेळेत उपलब्ध होऊ शकली. या आर्थिक मदतीबद्दल सरूबाई मुंजवार यांच्या कुटुंबियांनी समाधान व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षामार्फत गरजू रुग्णांना उपचारासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य कमीत कमी कालावधीत उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले जात आहे. सरूबाई मुंजवार यांच्या प्रकरणात अर्ज प्राप्त होताच आवश्यक पडताळणी व कार्यवाही पूर्ण करून अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्यास मंजुरी देण्यात आली. आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यास मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून अल्पावधीत आर्थिक सहाय्य मंजूर करण्याची कार्यपद्धती अवलंबिली जाते. गरजू रुग्णांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत अधिक माहिती अथवा मार्गदर्शनासाठी टोल फ्री क्रमांक १८०० १२३ २२११ वर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

## हरंगुळ बु. येथे ४ जुलै रोजी संवेदना दिव्यांग औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत दिव्यांगासाठी पंडीत दीनदयाल उपाध्याय विशेष रोजगार मेळावा

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर/ **प्रतिनिधी:** लातूर येथील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर आणि हरंगुळ (बु.) येथील संवेदना दिव्यांग औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग उमेदवारांसाठी पंडित दीनदयाल उपाध्याय विशेष रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा ४ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता लक्ष्मी नगर, बरड वस्ती, हरंगुळ (बु.), ता. जि. लातूर येथील संवेदना दिव्यांग औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत होणार आहे.

या रोजगार मेळाव्यात लातूर येथील साईबाबा जनता सहकारी बँक लि., ऑटोमोटिव्ह मॅन्युफॅक्चर प्रा. लि., सुजया एंटरप्रायझेस (जया ह्युंदाई), अजय फार्म मेकॅनायझेशन, राजयोग बजाज, राजयोग ऑटो प्रा. लि., राजयोग मोटर्स एलएलपी, राजर्षी फाउंडेशन, जबिल सर्किट इंडिया प्रा. लि. आणि बधिरा गारमेंट या नामांकित आस्थापना प्रामुख्याने सहभागी होणार आहेत.

या विविध आस्थापनांमध्ये १८ ते ३५ वर्षे वयोगटातील दिव्यांग उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध असणार आहेत. यासाठी उमेदवारांची शैक्षणिक पात्रता १२ वी, कोणतीही पदवी, डिप्लोमा तसेच आय.टी. आय.च्या इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक, इलेक्ट्रिशियन, ड्रेस मेकिंग आणि कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रामिंग असिस्टंट या ट्रेड्सची असणे आवश्यक आहे. इच्छुक आणि पात्र दिव्यांग उमेदवारांनी ४ जुलै रोजी सकाळी १०:०० वाजता थेट मुलाखतीसाठी आवश्यक शैक्षणिक पात्रतेचे गुणपत्रक, प्रमाणपत्र, दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र, शैक्षणिक बायोडाटा आणि पासपोर्ट साईज फोटो यांच्या प्रत्येकी पाच प्रती (झेरॉक्स) सोबत घेऊन मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहावे.

या रोजगार मेळाव्याच्या अनुषंगाने उमेदवारांना काही अडचण असल्यास, त्यांनी मार्गदर्शन केंद्रातील दत्तात्रय कांबळे (मो. ९०२८२३८४६५), लहू भंडारे (मो. ८०५५९९२९००) आणि प्रवीण वाघमारे (मो. ९९२२९२५८९५) यांच्याशी संपर्क साधावा. तसेच विशेषतः कर्णबधिर व दिव्यांग उमेदवारांच्या मदतीसाठी सिद्धांत मंडाळे (मो. ९६३७९२०६६५) व आकाश मगर (मो. ८२३७३२०८४९) या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन लातूरचे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त नि. ना. सूर्यवंशी यांनी केले आहे.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयातील पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर व नागनाथ भालेराव सेवानिवृत्त

*सेवा गौरव सोहळ्याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी व कोषाध्यक्ष संजय बोरा यांच्या शुभ हस्ते त्यांचा सपत्नीक सत्कार*



**लातूर/प्रतिनिधी:** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागातील प्राध्यापक तथा पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरूडकर जवळपास ३५ वर्षाच्या व शिक्षकेत्तर कर्मचारी नागनाथ भालेराव ३६ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर दि.३० जून २०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले.त्यानिमित्त महाविद्यालयात आयोजित सेवा गौरव सोहळ्याप्रसंगी त्यांचा दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी व कोषाध्यक्ष संजय बोरा यांच्या शुभ हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला.याप्रसंगी संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ.जयप्रकाश दरगड, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, सत्कारमूर्ती पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरूडकर,सौ. अंजली वरूडकर आणि सत्कारमूर्ती नागनाथ भालेराव,सौ.भालेराव, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोप करताना दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी असे म्हणाले की,आज विज्ञान व तंत्रज्ञान आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्सला अनन्यसाधारण असे महत्त्व असून शिक्षकांनी हाडाचा शिक्षक बनून सक्षम विद्यार्थी घडविले पाहिजेत.समाजोपयोगी व राष्ट्र विकासासाठी पुढाकार घेतला पाहिजे असे सांगण्याबरोबर त्यांना सेवापूर्तीनिमित्त भावी आयुष्यासाठी त्यांनी शुभेच्छाही दिल्या.

संस्थेचे एडिओ डॉ.जयप्रकाश दरगड असे म्हणाले, डॉ. हेमंत वरूडकर हे सच्चे मित्र, आदर्श शिष्य व उत्तम सहकारी आहेत. तसेच नागनाथ भालेराव हेही प्रामाणिकपणे काम करणारे शिक्षकेत्तर कर्मचारी होते अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी दयानंद परिवारामध्ये काम करणाऱ्या प्रत्येकांचे वेगळे स्टेटस असून दयानंद शिक्षण संस्था मातृसंस्था आहे असे ते म्हणाले.सत्कारमूर्ती डॉ.हेमंत वरूडकर यांनी वैयक्तिक शैक्षणिक जीवनाचा आढावा घेत दयानंद शिक्षण संस्था ही आई असून या संस्थेमुळेच मी घडलो असे त्यांनी मनोगतातून व्यक्त केले.नागनाथ भालेराव यांनी संस्थेप्रती ऋण व्यक्त केले.

प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे यांनी केले तर आभार डॉ.महेश बेंबडे यांनी मानले.सूत्रसंचालन प्रा.बळवंत सूर्यवंशी यांनी केले.यावेळी सुरूची भोजनाचाही सर्वांनी आस्वाद घेतला.याप्रसंगी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# महावितरणचे 'स्मार्ट'पाऊल, योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन; पात्र ग्राहकांना अत्यल्प दरात एक किलोवॅट क्षमतेची सोलर यंत्रणा बसवून मिळणार

**लातूर/प्रतिनिधी:** राज्यातील दारिद्र्रेषेखालील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील घरगुती वीज ग्राहकांची वीज बिलाच्या त्रासातून कायमची सुटका करण्यासाठी राज्य शासनाने एक महत्त्वपूर्ण 'स्मार्ट' पाऊल उचलले आहे. 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप सोलार' म्हणजेच 'स्मार्ट' योजना राबविण्यात येत असून, या योजनेअंतर्गत लातूर परिमंडळातील तब्बल ४ लाख ८६ हजार ४४७ ग्राहक पात्र ठरणार आहेत. विशेष म्हणजे, या योजनेत केंद्र सरकारच्या अनुदानासोबतच राज्यशासनाकडून भरघोस अतिरिक्त अनुदान मिळणार असल्याने आता सर्वसामान्यांना छतावर सौर ऊर्जा (रूफ टॉप सोलर) यंत्रणा बसविणे अत्यंत सोपे आणि खिशाला परवडणारे झाले आहे. 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर राबविल्या जाणाऱ्या या सुवर्णसंधीचा लातूर परिमंडलांतर्गत येणाऱ्या बीड, धाराशिव व लातूर जिल्ह्यातील पात्र वीजग्राहकांनी त्वरित लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणच्या लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता अरविंद



बुलबुले यांनी केले आहे.

लातूर परिमंडळातील एकूण ४ लाख ८६ हजार ४४७ पात्र ग्राहकांपैकी लातूर जिल्ह्यातील १ लाख ९७ हजार ९२१ आणि बीड जिल्ह्यातील १ लाख ४९ हजार ८६ तर धाराशिव जिल्ह्यातील १ लाख ३९ हजार ४४१ ग्राहकांचा यात समावेश आहे. यामध्ये दारिद्र्यरेषेखालील ३०५१ ग्राहकांचा समावेश असून, समाजातील प्रत्येक घटकाला यात सामावून घेण्याचा शासनाचा मानस आहे.

'स्मार्ट' योजनेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये मिळणारे भरघोस अनुदान! एक किलोवॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पासाठी अंदाजे ५० हजार रुपये खर्च येतो. केंद्र सरकारच्या 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजने' अंतर्गत यासाठी ३० हजार रुपयांचे अनुदान आधीच दिले जात आहे. आता यात राज्य शासनाने आपल्या 'स्मार्ट'योजनेची भर घालत दारिद्र्यरेषेखालील ग्राहकांसाठी ३५ टक्के (१७,५०० रुपये) अतिरिक्त अनुदान जाहीर केले आहे. त्यामुळे या घटकातील ग्राहकांना ५० हजारांचा हा प्रकल्प उभारण्यासाठी स्वतःच्या खिशातून अवघे २,५०० रुपये खर्च करावे लागतील. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील अनुसूचित जाती व जमातीच्या लाभार्थ्यांना ३० टक्के तर सर्वसाधारण गटाला २० टक्के अतिरिक्त अनुदान मिळणार असल्याने, त्यांचा प्रत्यक्ष आर्थिक वाटा अवघा ५ ते १० हजार रुपयांच्या दरम्यान असणार आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठी काही सोप्या अटी निश्चित करण्यात आल्या आहेत. अर्जदार हा केवळ घरगुती वीज ग्राहक असावा आणि त्याच्याकडे वैध वीज जोडणी असणे आवश्यक आहे. तसेच, सौर पॅनेल्स बसविण्यासाठी छतावर पुरेशी मोकळी जागा असणे गरजेचे आहे. ग्राहकाने यापूर्वी कोणत्याही सौर अनुदान योजनेचा लाभ घेतलेला नसावा, तसेच गेल्या १२ महिन्यांतील त्याचा सरासरी मासिक वीज वापर १०० युनिटपेक्षा कमी असावा. या योजनेसाठी महावितरण ही मुख्य अंमलबजावणी यंत्रणा म्हणून काम पाहत असून, यामध्ये पूर्णपणे भारतीय बनावटीचे आणि आयईसी (खएउ) प्रमाणित सोलर मॉड्यूल्स वापरले जातील. विशेष म्हणजे, पुरवठादाराकडून ग्राहकांना तब्बल ५ वर्षांची मोफत देखभाल व दुरुस्तीची हमी (वॉरंटी) दिली जाणार आहे.

छतावरील सौर ऊर्जा प्रणालीमुळे ग्राहकांना अनेक फायदे मिळतील. यामुळे घरगुती वीज बिल तर शून्यावर येईलच, पण त्यासोबतच गरजेपेक्षा जास्त निर्माण झालेली वीज महावितरणला परत विकून ग्राहकांना अतिरिक्त उत्पन्नाची मोठी संधी मिळेल. ही पूर्णपणे स्वच्छ आणि पर्यावरणपूरक ऊर्जा असल्याने निसर्गाचे रक्षण होईल आणि स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती होऊन हरित विकासाला मोठी चालना मिळेल. या अत्यंत फायदेशीर योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र ग्राहकांनी विनाविलंब राष्ट्रीय सौर पोर्टलवर (छ्रीळेपरश्र झ्रीींरश्र) आपली नोंदणी करावी आणि आपले घर स्वयंपूर्ण बनवावे, असे महावितरणने कळविले आहे.

## अमृततर्फे संघ लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) नागरी सेवा (पूर्व) परीक्षा -२०२६ उत्तीर्ण उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी अर्थसहाय्य

**लातूर/प्रतिनिधी:** महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) तर्फे राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील, अमृतच्या लक्षित गटातील (ब्राह्मण, कायस्थ, कोमटी, मारवाडी, पाटील, राजपूत, यलमार, अय्यंगार, राजपुरोहित, पाटीदार, वैश्य, नायर, नायडू, कम्मा, बनिया, बंगाली, त्यागी, सेनगुंथर, गुजराती, जाट, हिंदू नेपाळी, भूमिहार, लोहारणा, कानबी, इत्यादी) उमेदवारांना संघ लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) नागरी सेवा मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी व मुलाखतीच्या पूर्वतयारीसाठी उत्तीर्ण उमेदवारांना प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य (सन २०२६-२७) योजना राबविण्यात येत आहे.

सन २०२६-२७ मध्ये (युपीएससी) नागरी सेवा पूर्व परीक्षा-२०२६ उत्तीर्ण झालेल्या आणि आर्थिक सहाय्याचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत. यासाठी संबंधितांनी https://mahaamrut.org.in/ या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरावा. अर्ज सादर करण्यापूर्वी सूचनांचे पालन करावे. या योजनेविषयी भविष्यातील सर्व माहिती/सूचना केवळ अमृतच्या संकेतस्थळावरच प्रसिद्ध करण्यात येतील. योजनेच्या अधिक माहितीसाठी व ऑनलाइन अर्ज भरण्यासंबंधी काही शंका असल्यास संबंधित जिल्हा अमृत कार्यालयाशी संपर्क साधावा.

या योजनेंतर्गत पात्र उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी ५० हजार रुपये फक्त व मुलाखतीच्या पूर्वतयारीसाठी २५ हजार रुपये फक्त इतके प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. या योजनेसाठी ऑनलाइन/संकेतस्थळावर अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक १७ जुलै, २०२६ आहे. अधिक माहितीसाठी अमृत कार्यालय, मयुरेश्वर अपार्टमेंट, पितृछाया बिल्डिंग, पहिला मजला, सिग्नल कॅम्प, विद्यानगर, लातूर (भ्रमणध्वनी: ७३९१०६५४७०) येथे संपर्क साधावा.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# रोटरी क्लब ऑफ लातूर होरायजन तर्फे रोटरी, डॉक्टर्स, सीए आणि एग्रीकल्चर डे उत्साहात संपन्न



**लातूर/प्रतिनिधी:** रोटरी ही एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२मध्ये एकूण ११ जिल्ह्याचा समावेश असून यामध्ये लातूर जिल्ह्यामध्ये रोटरीचे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. रोटरीमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीपासून ते स्थानिक पातळीपर्यंत अध्यक्ष आणि सचिव म्हणून नेतृत्वाची एक वर्ष सामाजिक कार्यासाठी संधी दिली जाते. रोटरीचे वर्ष हे एक ०१ जुलै ते ३० जून असे असते. लातूर शहरांमध्ये माजी प्रांतपाल रो.डॉ.विजयभाऊ राठी, रो.डॉ.गोपीकिशन भराडिया आणि स्व. रो.सीए तेजमल बोरा यांच्या मार्गदर्शनाखाली २००७मध्ये रोटरी क्लब ऑफ लातूर होरायजन निर्मिती करण्यात आली.

रोटरी वर्ष २०२२६-२७साठी अध्यक्ष म्हणून रो.डॉ.माधव गोरे तर सचिव म्हणून रो.डॉ. घनश्याम ताडेवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

रोटरी क्लब ऑफ लातूर होरायजन तर्फे रोटरी, डॉक्टर्स, सीए आणि एग्रीकल्चर डे ठिकठिकाणी उत्साहात साजरा करण्यात आला.

डॉक्टर डे निमित्त विवेकानंद रुग्णालयातील डॉ. गोपीकिशन भराडिया, डॉ.हनुमंत किनीकर, अध्यक्ष अनिल अंदोरीकर आणि सर्व डॉक्टर्स बंधू-भगिनींचा क्लब तर्फे दृष्टी बाधितांनी बनविलेली सुगंधित मेणबत्ती आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वामी विवेकानंद यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला नवनिर्वाचित अध्यक्ष रो. डॉ.माधव गोरे आणि अध्यक्ष अनिल अंदोरीकर यांनी पुष्पहार अर्पण केला.

आयुर्वेदाचार्य तथा नवनियुक्त सहाय्यक प्रांतपाल डॉ.राजगोपाल तापडिया आणि वैष्णवी हॉस्पिटल अँड इंडोस्कॉपी सेंटर येथील डॉ.राजेश दरडे यांचाही सत्कार करण्यात आला.

सीए डे निमित्त मराठवाड्यातील नामांकित सीए गणेश महापूरकर आणि ईशान वाडेकर (सांगली) यांनी सीएची राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल त्यांचे आजोबा रो.डॉ.आर.के.कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला.

रोटरी डे आणि मॅरेज निवरसरी निमित्त माजी प्रांतपाल रो.डॉ.विजयभाऊ राठी यांचा सत्कार करण्यात आला.

एग्रीकल्चर डे निमित्त औसा तालुक्यातील सेलू येथील जिल्हा परिषद केंद्रीय शाळेत शेतकरी, पालक आणि विद्यार्थी सन्मान समारंभ आणि वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी शेतकरी खंडू लांडगे, गणेश जाधव, श्रीकांत पाटील, दिनेश पाटील, सूर्यवंशी सागर, ईश्वर माने, कृष्णा कोमटवाड आदी शेतकऱ्यांचा आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा आंबा वृक्ष, शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी मुख्याध्यापक नंदकुमार कदम, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गोविंद मंठाळकर, उपाध्यक्षा नजमूनबी युसुफ शेख, नवनिर्वाचित अध्यक्ष तथा विशेष शिक्षक रो.डॉ.माधव गोरे, सचिव रो.डॉ. घनश्याम ताडेवार, माजी प्रांतपाल रो.डॉ.विजयभाऊ राठी, रो.डॉ.गुणवंत बिरादार, रो.डॉ.संजय गवई आणि रो.महादेव पांडे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सूर्यवंशी बी.डी. यांनी केले तर आभार सूर्यवंशी ए.एम. यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माने मॅडम, गुणाले मॅडम, गिरी मॅडम, सय्यद मॅडम, बनसोडे सर, मुंडे सर यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाला सेलू गावातील पालक, शेतकरी, ग्रामस्थ आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निलंगा नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत २७ महत्त्वाच्या विषयांना मंजुरी

## प्लास्टिक बंदी, पाणीपुरवठा, सौर ऊर्जा, स्वच्छता, रस्ते, अतिक्रमण हटावसह अनेक महत्त्वाचे निर्णय



**निलंगा /मोईज सितारी:** निलंगा नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा सोमवार (दि. ३० जून) रोजी नगरपरिषदेच्या सभागृहात शांततापूर्ण व सकारात्मक वातावरणात पार पडली. नगराध्यक्ष संजयराज हलगरकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत शहराच्या विकासाशी संबंधित एकूण २७ महत्त्वाच्या विषयांना मंजुरी देण्यात आली. या सभेचे सचिव म्हणून मुख्याधिकारी संतोष लोमटे, तर सभा अधीक्षक म्हणून दिगंबर साठे यांनी कामकाज पाहिले. यावेळी नगरपरिषदेचे सर्व सभापती, नगरसेवक, विभागप्रमुख व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्यात आले. त्यानंतर शहरातील प्लास्टिक मुक्त व बंदी, पाणीपुरवठा, स्वच्छता, वीज व्यवस्था, सौर ऊर्जा, कर आकारणी, बाजार व्यवस्था, अतिक्रमण हटाव, रस्ते, सार्वजनिक सुविधा, विकासकामे आणि विविध प्रशासकीय विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. अनेक नगरसेवकांनी आपल्या प्रभागातील नागरिकांच्या समस्या सभागृहात मांडत त्या तातडीने सोडविण्याची मागणी केली. सर्व विषयांवर सविस्तर चर्चा करून एकमताने मंजुरी देण्यात आली. नगरपरिषदेच्या आर्थिक स्वावलंबनासाठी सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

तसेच प्रकल्पासाठी जागा संपादन किंवा भाडेतत्त्वावर जमीन घेऊन प्रकल्प विकसित करण्यास आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्यास मंजुरी देण्यात आली. शहरातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करून वाढीव वस्त्यांमध्ये पाणीपुरवठा पाइपलाइन विस्तार, गळती दुरुस्ती, आवश्यक साहित्य खरेदी, घनकचरा व्यवस्थापनासाठी निविदा, स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत सार्वजनिक शौचालय उभारणी, विविध भागांत नवीन विद्युत पोल व सोलार पथदिवे उभारणी यासह अनेक विकासकामांनाही हिरवा कंदील देण्यात आला.

शहरातील प्रमुख रस्त्यांवरील अतिक्रमण हटवून वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याचा निर्णय, पांचाळ कॉलनी येथे नवीन पोलीस चौकी उभारणी, मान्सूनपूर्व कामे तातडीने पूर्ण करणे, एमआरटीपी अंतर्गत आरक्षण बदल प्रस्ताव शासनाकडे पाठविणे, मालमत्ता मूल्यांकन दरांना मंजुरी, बाजार बोली मुदतवाढ, सेवा शुल्क सुधारणा तसेच शहरातील नाली व गटारीमध्ये ८० टक्के प्लास्टिक आढळल्याने निलंगा शहर प्लास्टिक मुक्त बंदी करण्याचा निर्णय घेण्यात आला असून येत्या ३० जुलै पर्यंत नागरिक व्यापाऱ्यांनी आपल्या जवळील प्लास्टिक ची व्हिलेवाट लावावे ३० जुलै नंतर प्लास्टिक आढळून आल्यानंतर कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, त्यामुळे नागरिक व व्यापाऱ्यांनी प्लास्टिक मुक्त शहर करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहनही करण्यात आले. आणि विविध योजनांतील विकासकामांनाही सभेने मंजुरी दिली. यावेळी नगरसेवकांनी विविध प्रभागांतील पाणी, रस्ते, स्वच्छता, प्रकाश व्यवस्था आणि नागरी सुविधांबाबत सूचना मांडल्या. संबंधित अधिकाऱ्यांनी त्या लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

### पांचाल कॉलनी येथे नवीन पोलिस चौकी उभारणार

शहरातील प्रमुख रस्त्यांवरील अतिक्रमण हटवून वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याचा निर्णय, पांचाळ कॉलनी येथे नवीन पोलीस चौकी उभारणी, मान्सूनपूर्व कामे तातडीने पूर्ण करणे, एमआरटीपी अंतर्गत आरक्षण बदल प्रस्ताव शासनाकडे पाठविणे, मालमत्ता मूल्यांकन दरांना मंजुरी, बाजार बोली मुदतवाढ, सेवा शुल्क सुधारणा आदी निर्णय घेण्यात आले. शहर विकासावर भर देण्याचे निर्णय घेण्यात आले.

### नगरपरिषदे सौर प्रकल्प उभारणीचा मार्ग मोकळा

निलंगा शहर प्लास्टिक मुक्त व बंदी करण्याचा निर्णय नगरपरिषदेसाठी सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीला मंजुरी शहरातील वाढीव वस्त्यांमध्ये पाइपलाइन विस्तार व गळती दुरुस्ती. प्रमुख रस्त्यांवरील अतिक्रमण हटवून वाहतूक सुरळीत करणार वाढविणे. शहरातील बॅनर विविध प्रभागांत सोलार पथदिवे, नवीन विद्युत पोल उभारणी. सार्वजनिक स्वच्छता, स्मशानभूमी व शौचालयांच्या सुविधा लावण्यासाठी नवीन दर, जागाव अटी-शर्ती निश्चित करणे. मालमत्ता व खुल्या भूखंडांच्या चतुर्थ वार्षिक मूल्यांकन दरांना मंजुरी. अनधिकृत कत्तलखाने बंद करून पालिकेचे कत्तलखाना पूर्ववत सुरू करणे.

### शहर विकासाच्या निर्णयाची अंमलबजावणी व्हावी

नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत विशेषतः प्लास्टिक मुक्त शहर, पाणीपुरवठा सुधारणा, अतिक्रमण हटविणे, सौर ऊर्जा प्रकल्प, स्वच्छता व्यवस्था, नवीन विद्युत पोल आणि सोलार पथदिवे उभारणी यांसारखे निर्णय नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. मात्र, हे निर्णय केवळ कागदावर न राहता त्यांची तातडीने आणि दर्जेदार अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

**– विद्याताई सगरे, माजी नगरसेवका**

### विकासाच्या निर्णयाला नागरिकांचे सहकार्य हवे

सर्वसाधारण सभेत शहराच्या विकासाशी संबंधित २७ महत्त्वपूर्ण विषय मंजूर करण्यात आले आहेत. नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व मंजूर कामे गुणवत्तापूर्ण व वेळेत पूर्ण करण्यात येतील. शहर प्लास्टीकमुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. नागरिक व व्यापाऱ्यांनी प्लास्टिक मुक्त शहर करण्यासाठी सहकार्य करावे.

**– संजयराज हलगरकर, नगराध्यक्ष**

# लातूर मनपा आयुक्तपदी राहुल कुलकर्णी रुजू



**लातूर/प्रतिनिधी:** लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून राहुल कुलकर्णी यांनी गुरुवारी (दि. २ जुलै ) पदभार स्वीकारला. यावेळी महापौरांसह प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा येथील मूळ रहिवासी असणारे राहुल कुलकर्णी हे १९९७ मध्ये कक्ष अधिकारी म्हणून शासकीय सेवेत रुजू झाले. आतापर्यंत त्यांनी सहकार,नगर विकास, सामान्य प्रशासन विभाग, वैद्यकीय शिक्षण, महसूल व वनीकरण तसेच गृह विभागात वेगवेगळ्या पदावर कार्य केलेले आहे. विशेष म्हणजे २०२० मध्ये सरळ सेवा परीक्षेद्वारे ते भारतीय प्रशासन सेवेत रुजू झाले.शासनाने नुकतीच त्यांची लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्तपदी नियुक्ती केली आहे. गुरुवारी त्यांनी पदभार स्वीकारला.

यावेळी महापौर जयश्रीताई सोनकांबळे, उपमहापौर स्नेहल उटगे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले,विरोधी पक्षनेते देविदास काळे यांच्यासह सर्वपक्षीय नगरसेवकांनी त्यांचे स्वागत केले. अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त वसुधा फड, डॉ. पंजाबराव खानसोळे यांनी प्रशासनाच्या वतीने आयुक्तांचे स्वागत करून कामकाजाची माहिती दिली.

# जि.प. प्रशाला(मुलांची) निलंगा येथील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलन उत्साहात साजरा

**निलंगा/प्रतिनिधी:** येथील जिल्हा परिषद प्रशाला( मुलांची) निलंगा या शाळेतील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. हा स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम निलंगा येथील शासकीय विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला माजी विद्यार्थी व परभणी येथील पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत असलेले विलास गोबाडे, रियल इस्टेट गुंतवणूकदार व गुत्तेदार अंकुशराव ढेरे हा कार्यक्रम आयोजित केलेले सराफ व्यापारी रामचंद्र उर्फदिपक नाईक गणेश वर्ल्ड राईसचे उद्योजक संतोष आप्पा सोरडे इत्यादी सह अनेक माजी विद्यार्थी या स्नेहसंमेलनाच्या उपस्थित होते.

यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक विलास गोबाडे म्हणाले की सन १९९२/९३ च्या बॅचमधील विद्यार्थ्यांनी जि प प्रशाला मुलांची निलंगा या आपल्या शाळेचे नाव जिल्हाभरात लौकिक केले होते. त्यावेळी प्रत्येक विद्यार्थी आपल्या गुरुजन वर्गाचा मानसन्मान ठेवून तसेच आपल्या आई-वडिलांच्या आज्ञा चे पालन करून शिक्षण घेत होते असे ते जुन्या आठवणींना उजाळा देऊन आजच्या घडीचे शिक्षण व पूर्वीच्या शिक्षणाची पद्धत वेगळी होती असे ते म्हणाले.

त्या काळातील अनेक विद्यार्थी गरीब वंचित असून सुद्धा आपल्या शाळेचे नाव करण्याचे स्वप्न विद्यार्थी पाहत होती. मात्र आताचे शिक्षण हे गरिबांना न परवडणारे असून राज्यात शिक्षणाचे संपूर्ण बाजारीकरण झाल्याचे त्यांनी या वेळेस बोलताना सांगितले. एकीकडे गरिबीची झुंज देत आपण आपल्या शाळेची ही नाव लौकिक करून आपण सर्वांनी एक वेगळा ठसा निर्माण केल्याचे अंकुशराव ढेरे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## वर्षा सहली..

वर्षा सहली मस्त
रंगलेल्या रंगतदार
कधी ती रिमझिम
बरसते संततधार
निसर्ग निर्मित झरे
उत्साह दे धुवांधार
इंद्र धनुष्य मनोहर
मिटे मनीचा अंधार
नेत्रा सुखावेसुशांत
चादरी हिरव्यागार
पोतडी खूप अद्भुत
पर्यावरण जादूगार
फक्त देत राहे दाता
साक्षात किमयागार
विविध रंगाची फुले
रे उधळणबहारदार
निसर्गसाक्षात उभा
उघडून आपले दार
पोतडीतल्या चिजा
वाटत राहे दिलदार
इथे रोखीतमामला
ठेवत नाहीत उधार
गुपीते करतो उघडे
मन मोकळे भरदार
जराजपून सहलीत
सुरक्षेवरी हो मदार
धाडस येई अंगलट
नकोजीवावर उदार

**हेमंत मुसरीफ पुणे**
९७३०३०६९९६

# उपवर्गीकरण विरोधी कृती समिती आक्रमक; केंद्र सरकारच्या प्रस्तावावर तीव्र नाराजी

## आरक्षणाचे तुकडे पाडण्याचे षडयंत्र खपवून घेणार नाही



**निलंगा/अयुब बागवान:** अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याच्या केंद्र सरकारच्या प्रस्तावाच्या विरोधात निलंगा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कमध्ये शनिवारी एक भव्य बैठक पार पडली. उपवर्गीकरण विरोधी कृती समितीच्या वतीने आयोजित या बैठकीत उपस्थितांनी आरक्षणाचे तुकडे पाडण्याच्या षडयंत्राविरुद्ध तीव्र संताप व्यक्त केला. जोपर्यंत हा प्रस्ताव मागे घेतला जात नाही, तोपर्यंत हा लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

या बैठकीत बोलताना वक्त्यांनी केंद्र सरकारच्या प्रस्तावावर जोरदार हल्लाबोल केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुसूचित जातीच्या ५९ जातींना एकत्र आणून त्यांना आरक्षणाचे कवच दिले. मात्र, आता उपवर्गीकरणाच्या नावाखाली या ५९ जातींना आपापसात लढवून आरक्षणाचा मूळ गाभा संपवण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे कारस्थान समाजबांधव कदापि यशस्वी होऊ देणार नाहीत, असा इशारा देण्यात आला.

यावेळी या बैठकीतील महत्त्वाचे ठराव घेण्यात आले.ते खालीलप्रमाणे आहेत.त्यात प्रामुख्याने उपवर्गीकरण हा आरक्षणाचे अस्तित्व नष्ट करण्याचा एक 'डायव्हर्जन प्लॅन' असून, तो वेळीच उधळून लावणे आवश्यक आहे,

समाजाच्या ऐक्याला सुरुंग लावणारी कोणतीही हालचाल खपवून घेतली जाणार नाही,

यापुढे केवळ निवेदने देऊन चालणार नाही. जर आरक्षणावर गदा आली, तर या अन्यायाविरुद्ध रस्त्यावर उतरून तीव्र संघर्ष केला जाईल,ज्यांना खरोखरच समाजाची चिंता आहे, त्यांनी आरक्षणाचे तुकडे पाडण्यापेक्षा ते आरक्षण १०० टक्के कसे लागू होईल, यासाठी लढा द्यावा,यावेळी या बैठकीला मोठ्या प्रमाणावर लोकसहभाग होता.

या बैठकीचे अध्यक्षपद सेवानिवृत्त शिक्षक मारोतीराव कांबळे (गुरुजी) यांनी भूषविले. यावेळी माजी नगरसेवक विजयकुमार सूर्यवंशी, अर्जुनाप्पा कटके, सूर्यकांत कांबळे (अनसरवाडकर), आयुब कुरेशी (वंचित देवणी तालुकाध्यक्ष), शिराज चांद साहब शेख, सोनेराव नागनाथ बनसोडे, पांडुरंग किशनराव साळुंखे, रणवीर भालके, बालाजी दत्तू कांबळे, नागनाथ विठ्ठल नरहरे, व्यंकट पांडुरंग तेलंगे, सुनील विश्वनाथ आरेराव,हाक सय्यद लालू मिस्त्री, भाऊसाहेब साधुराम बनसोडे (तालुका अध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी), सूर्यवंशी दिलीप शामराव, विठ्ठल व्यंकट कांबळे, कांतराव गणपती कांबळे, सुग्रीव शंकर कांबळे, विजय उस्तुरे, दत्तात्रेय मारुती सूर्यवंशी, गोरोबा दामाजी , बोंबलगे बामणी, भालके वामन खंडा, सत्यनारायण धोंडीबा सूर्यवंशी, भगवानदादा कांबळे, बालाजी कांबळे टेलर आणि एमडी सूर्यवंशी यांच्यासह निलंगा, शिरूर अनंतपाळ आणि देवणी तालुक्यातील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. निलंग्यातून पेटलेला हा संघर्षाचा वणवा आता संपूर्ण महाराष्ट्रात आरक्षणाच्या रक्षणासाठी एक दिशादर्शक ठरणार असल्याचे चित्र या बैठकीनंतर दिसून आले.

# रस्सीखेच क्रीडा स्पर्धे-तील खेळाडूंचा सत्कार

**लातूर/प्रतिनिधी:** नुकत्याच जम्मू-कश्मीर येथील कुलगाममध्ये झालेल्या राष्ट्रीय रस्सीखेच क्रीडा स्पर्धेच्या साखळी सामन्यात महाराष्ट्राने अनेक संघांना पराजित करीत अंतिम सामन्यापर्यंत धडक मारली. महाराष्ट्र संघाच्या कामगिरीत लातूरची कन्या स्नेहा खोबरे हिने मोलाची कामगिरी बजावली. संघात कर्णधार संस्कृती साळुंखे, रुकय्या सय्यद, श्रुती सूर्यवंशी, सोनम साठे, श्रुती कदम, श्रेया राठोड, वैष्णवी बोबडे या खेळाडूंचा सहभाग होता. संघाच्या प्रशिक्षकपदी सरस्वती विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक शेळके यांची निवड झाली होती. गुणवंत खेळाडू व प्रशिक्षकांचे कौतुक महाराष्ट्र रस्सीखेच संघटनेच्या अध्यक्ष माधवी पाटील, सचिन गुपिले, राष्ट्रीय पंच राहुल वाघमारे, लातूर जिल्हा संघटनेचे सचिव पिसाळ, सदस्य, शेप, प्रशांत खोबरे, बालाजी साठे, अनिल राठोड, शिवाजी कदम, हकीम सय्यद, सूर्यवंशी आदींनी केले. तसेच वरवंटी बसवंतपूर, हरंगुळ बु, येथील आजी-माजी सरपंच व ग्रामस्थांनी खेळाडूंचा सत्कार केला. रस्सीखेच क्रीडा स्पर्धेत देशातील १८ राज्यांनी सहभाग नोंदवला होता. साखळी सामन्यात महाराष्ट्राने हिमाचल प्रदेश, दिल्ली, तामिळनाडू, हरियाणा, उत्तरप्रदेश, गुजरात या संघांना पराजित केले. अंतिम सामना केरळसोबत झाला. देशात महाराष्ट्राला दुसरा क्रमांक मिळाला. १९ वर्षे वयोगटातून महाराष्ट्राला देश पातळीवर तिसरा क्रमांक मिळाला.

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

टोनर रिफिलिंग

फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६